# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक १९.०३.२००८ (कार्यक्रम पत्रिका क्र.०६) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे

## इतिवृत्त

बुधवार दि १९मार्च २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त श्री.घुगे,नगर सचिव एम.ए.पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१६. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२४. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२५. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२६. स.स.सौ.दिपाली सुनिल पाटील
२७. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२८. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२९. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान

३०. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
३१. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३२. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३३. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदिर
३४. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३५. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३६. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३७. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३८. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३९. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
४०. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन खान
४१. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
४२. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
४३. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
४४. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४५. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४६. स.स.सौ.राऊत छाया विलास
४७. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४८. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५०. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
५१. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
५२. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफीज
५३. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ म.युनुस
५४. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५५. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
५६. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
५७. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५८. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५९. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
६०. स.स.सौ.रेखा कैलास काथार
६१. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६२. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६३. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
६४. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
६५. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
६६. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
६७. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६८. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६९. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
७०. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद

७२. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७३. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
७४. स.स.सौ.जाधव संगीता विठ्ठलराव
७५. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७७. स.स.सौ.वंदना प्रकाश खंदारे
७८. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७९. स.स.श्री.जोशी संजय रामदास
८०. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८१. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८२. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
८४. स.स.सौ.अल्पा विकास जैन
८५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
८६. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
८७. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०२. स.स.श्री.राजेश गुलाबचंद व्यास
०३. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०४. सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.प्रशांत देसरडा : शहरात किती मंगल कार्यालय आहेत कितींना परवानगी दिली पार्कींग तसेच नळ कनेक्शन आहे की नाही याचा अहवाल प्रशासनास सादर करण्याचे मागिल बैठकीत आदेशीत केले होते तसेच महापालिकेला आलेले अनेक चेक बॉन्स झालेले आहे याची चौकशी करून संबधीतावर योग्य ती मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी नेमका काय प्रकार झाला त्याचाही अहवाल सादर करण्याचे आदेशीत केले होते.अहवाल आला असेल तर सभागृहात वाचून दाखववावा.

नगर सचिव :दिं.१६-२-२००८ रोजीच्या सभेत मंगल कार्यालय संदर्भात सभागृहात माहिती विचारण्यात आली होती. प्रशासनाकडून माहिती प्राप्त झालेली आहे. एकूण ७४ मंगल कार्यालयाची यादी दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :शहरात मंगल कार्यालय किती, परवानगी किती मंगल कार्यालयास आहे लिगल किती,रजिस्टरर्ड किती आहे याचा अहवाल मागविला होता जी माहिती आलेली आहे ती फक्त कोणत्या मंगल कार्यालयाकडे नळ कनेक्शन आहेत याची माहिती दिली.सभागृहात दिलेले आदेश प्रशासन पाळत नसेल तर गंभीर विषय आहे नगररचना विभागाकडून अहवाल मागविला होता मालमत्ता विभागाचा संबध येत नाही. चेक बॉउन्स संदर्भात मा.आयुक्तांनी काय अहवाल सादर केलेला आहे.

श्री.संजय जोशी :आलेला अहवाल नळ कनेक्शनचा दिला आहे. त्यात चेलीपूरा फंन्शन हॉलला तीन नळ कनेक्शन दाखवले परंतू ते व्यावसायिक की घरगुती आहे याचा उल्लेख नाही.फक्त तीन खातेक्रमांक दिले असे का ?

मा.महापौर :मागिल बैठकीमध्ये शहरात किती मंगल कार्यालय आहे त्यांना परवानगी दिली का, टॅक्स कमर्शिलय लागलेला आहे याची संपूर्ण प्रशासनाकडून माहिती मागविली होती, तसे आदेश नगररचना विभागास दिले होते. कोणतीही माहिती माझेकडे सभागृहापूढे आलेली नाही.नळ कनेक्शन बाबत माहिती दिली ती सुध्दा अपुर्ण आहे.मार्च महिना चालू आहे वसूली चालू आहे नगररचना विभागाने माहिती न देणे हे प्रशासनाने गंभीरतेने घेतले नाही. चेलीपूरा फंन्शन हॉल मध्ये तीन कनेक्शन ते कोणते किती इंचचे आहे याचा उल्लेख दिला नाही.

श्री.संजय जोशी :अहवालामध्ये मंगल कार्यालयाचे कनेक्शन असे दिले आहे, यापैकी मंगल कार्यालय म्हणून परवानगी आहे का? मंगल कार्यालय साठी किती स्क्वेअर फुटचा प्लॉट पाहिजे. अग्निशमन विभागाची एनओसी पाहिजे माझ्या माहिती प्रमाणे १०,००० स्क्वे. फुटपेक्ष मोठा प्लॉट असेल तसेच पार्कींगसाठी जागा असेल तर मंगल कार्यालयासाठी परवानगी देता येते. १०००,२००० स्क्वे. फुट जागेवर परवानगी देवून प्रशासन त्यास मंगल कार्यालय म्हणत असेल तर योग्य नाही.कितीना मंगल कार्यालय म्हणून परवानगी आहे.

श्री.प्रशांत देसरडा :दोन तीन सर्वसाधारण सभेपासून माझेसह अनेक स. सदस्य विविध प्रश्न विचारत आहे ऐनवेळेवर प्रश्न विचारल्यावर प्रशासनाकडे उत्तर नसते म्हणून एक दोन महिने अगोदर प्रश्न विचोरून माहिती घेण्याचा प्रयत्न करतो तरी माहिती दिली जात नाही याचा अर्थ महापौरांचे आदेशावर प्रशासन गंभीरतेने दिसून येत नाही. आजच्या सभेल अनेक विभाग प्रमुख उपस्थित दिसत नाही. सर्वसाधारण सभेचे आदेशाचे पालन होत नसेल ज्या अधिका-यांनी माहिती दिली नसेल त्यांचेवर कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :मागिल बैठकीत ज्यांना मंगल कार्यालय म्हणून परवानगी दिलेली आहे याचा खुलासा नगररचना विभागाने देणे आवश्यक होते. कोणताही खुलासा आलेला नाही स. सदस्य श्री. देसरडा प्रशांत यांनी दोन तीन महिण्यापासून वारंवार सांगितले की अनेक चेक बॉन्स झालेले आहे यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली. ती पण माहिती आलेली नाही. मागिल दोन तीन बैठकीपासून सहा.संचालक नगर रचना या सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे असे म्हटले होते त्याची कोणतीही दखल प्रशासनाने घेतलेली दिसत नाही. अधिका-यांनी सभागृहात उपस्थित राहण्याची गरज प्रशासनाला वाटत नाही का? एक महिला अगोदर प्रश्न देवून ही त्याचे उत्तर का दिले जात नाही.

श्री.नासेर नाहदी :शहरात किती खाजगी कोचिंग क्लासेस चालू आहे त्यांना टॅक्स लागलेला आहे का असेल तर व्यावसायिक की निवासी टॅक्स आहे याचा ही खूलासा करावा्

मा.आयुक्त :जो प्रश्न स.सदस्यांनी विचारला होता त्या संदर्भात पाणीपूरवठा विभागाने माहिती दिली आहे. मंगल कार्यालय साठी परवानगी देतांना दोन तीन गोष्टीचे पालन व्हायला पाहिजे नियमानुसार त्यांस परवानगी दयायला पाहिजे. नळ कनेक्शन तसेच मालमत्ता कर हा कमर्शियल असावयास पाहिजे.बिल्डींग परवानगी नगररचना विभागाकडून नळ कनेक्शन पाणीपूरवठा विभागाकडून तर मालमत्ता कर हा कर आकारणी विभागाकडून अशी तीन विभागाकडून वेगवेगळी माहिती येणे होते त्यापैकी पाणी पुरवठा विभागाने माहिती दिली. या बाबतीत कार्य.अभियंता पाणीपूरवठा यांना याची चौकशी करण्यासाठी विशेष अधिकारी म्हणून नेमणूक करू त्यांनी तीनही विभागाकडील माहिती घेवून सादर करावी.

श्री.देसरडा प्रशांत :काय अहवाल दयायचा यावर प्रत्येक वेळी बोलणे नको,परंतू मागिल बैठकीत मा.महापौरांनी आदेशीत केल्यानंतर त्याची अमबजावणी का झाली नाही.

मा. आयुक्त : जे ॲक्शन पॉईन्ट नगर सचिव यांनी विभाग प्रमुखांना सर्क्युलेट केले आहे त्यानूसार कार्यवाही झाली नसेल तर विभाग प्रमुखांना त्यांचा त्यांचा खूलासा मागवून घेतला जाईल व त्यासह पुढील वेळी आपल्या समोर ते ठेवले जाईल

श्री.देसरडा प्रशांत : जे जबाबदार असतील त्यांचे एक वेतनवाढ रोखण्यात यावी.

मा. महापौर :या सभागृहाची अशी भावना आहे की ज्या ज्या विषयामध्ये प्रशासनाला काम करावयाचे सांगितले होते. त्या सर्व विषयामध्ये प्रशासनाने कुठेही दखल घेतलेली दिसत नाही ज्यामुळे महापालिकेचा टॅक्स वाढवू शकतो मोठी वसूल

होवू शकते अशा बाबतीत, मंगल कार्यालयाची माहिती तसेच नळ कनेक्शन बाबतीची माहिती मागविली होती ती माहिती समोर आलेली नाही जी माहिती आली ती व्यवस्थित आली नाही स.सदस्य श्री.देसरडा प्रशांत यांनी वारंवार प्रश्न विचारले की जे चेक बॉन्स झ ाले त्याबध्दल प्रशासनाने काय दखल घेतली त्याचाही अदयाप समाधानकारक अहवाल मिळालेला नाही. या सगळयावर सभागृहाची नाराजी आहे महापौर व पिठासीन अधिकारी म्हणून काही बाबतीत आदेशीत केले होते परंतू त्यांचे ही पालन झालेले नाही हे दुर्देवाने सांगावे लागते. यात दोषी असलेल्या अधिका-यांचे एक वेतनवाढ थांबवावे असे प्रशासनास आदेशीत करण्यात येते.

श्री.सय्यद खुसरो :शहरात बर्फचे कारखाने चालू आहे माझ्या वार्डात बर्फच्या कारखान्यात ७५ किलोचा गॅस होता अग्निशमन विभागाने हे धोकादायक असल्याचे जाहीर करून कार्यवाही करावी. जेंव्हा पहिल्यांदा घटना घडली काही लोक घाटीमध्ये ॲडमीट होते तेंव्हा कार्यवाही केली नाही. पुन्हा घटना घडली त्यानंतर पोलीसात गुन्हा दाखल केला पुर्वी घटना घडली त्यावेळेस का कार्यवाही केली नाही.

भोपाळमध्ये आतापर्यंत शिक्षा भोगत आहेत. जे दोषी असेल त्यांना निलंबीत करावे. नसता लोकशाही मार्गाने कार्यवाही केली जाईल.

श्री अ.साजेद अ.सत्तार : यापूर्वी घटना घडली घाटीमध्ये लोक उपचार घेत होते. त्यावेळी संबधीतावर पोलीसात गुन्हे दाखल केले जातील असे आश्वासन दिले गेले त्यानंतर दुस-यादा घटना घडली यास जे जबाबदार असतील त्यांचेवर काय कार्यवाही होणार आहे. सविस्तर चर्चा घेवून कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खान :यापूर्वी गॅस गळतीमूळे घटना घडली होती काही लोकांचा श्वास रोखला गेला होता ३४ लोकांना आजही त्रास होत आहे जेंव्हा दुस-यांदा घटना घडली तेंव्हा गुन्हा दाखल केले पुर्वीच्या घटनेच्या वेळी कार्यवाही केली असती तर दुस-या वेळेस झाले नसते. असे होत असेल तर नागरीकांना त्रास तसेच नुकसान होणार आहे यास कोण जबबादार आहे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :बर्फ तयार करतांना कोणते पाणी वापरले जाते याची शहानिशा करावी. हा बर्फ शहरातील अनेक ठिकाणी रसंवती लिंबु शरबतच्या गाडयावर वापरला जातो,चांगल्या पाण्याचा नसेल तर अनेक लोक यापासून आजारी पडू शकतात यासाठी दखल घेण्याची गरज आहे. जे कारखाने आरोग्यास घातक असतील याची चौकशी करून कार्यवाही व्हावी रसवंतीना परवानगी दिली तेथे स्वच्छता राहिल याची दखल घेण्याची गरज आहे. जे अनधिकृत बर्फ कारखाने असतील त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी.

सौ.लता दलाल :शहरात बर्फाचे किती कारखाने आहेत लिगल किती तसेच वर्षानुवर्ष एक मशीनरी वापरत असलेले किती, त्यातून जो बर्फ तयार होता तो शहरात विकला जातो.या संबधी काय कार्यवाही केलेली आहे.ज्यांचे नोंदी नसतील ते बंद करावे, बंद केले नाही तर त्यांचेवर गुन्हे दाखल करून त्याचे मालमत्ता जप्त कराव्यात.

श्री.अ.रशिद खान :बर्फ कारखान्यास शहरात परवानगी असणे आवश्यक आहे पहिल्यांदा घटना घडली त्यावेळी ॲक्शन घेतली नाही त्यावेळी कार्यवाही केली असती तर दुस-यांना घडले नसते. यास जबाबदार कोण आहे.त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. बर्फ कारखाने लोकवस्तीत नसावे.

श्रीमती मेहरून्नीसा खान:शहरात मंगल कार्यालय तसेच शादीखाना किती, अनधिकृत किती त्यांना किती टॅक्स आकारला जातो गरीब समाजाचे तसेच सोसायटीचे शादीखाने आहे. तसेच यास नळ कनेक्शन किती व्यासाचे आहे. तसेच जेथे पार्कींग नाही ते बंद करावे. गरीब समाजासाठी जी मंगल कार्यालय शादीखाने आहे त्यासाठी टॅक्स कमी ठेवावा.

श्री.संतोष जेजूरकर :अमोनिया तसेच दुसऱ्या एका प्रकारचा गॅस असे दोन प्रकारचे गॅस वापरले जातात दुसरा गॅस हा शरीराला हानीकारक नसतो.ज्यावेळी तपासणी होईल त्यावेळी याचा विचार करावा.

श्री.सय्यद खुसरो : अमोनिया गॅस गळती होते. जे अधिकारी या घटनेला जबाबदार असतील त्यांना निलंबीत करावे. आपण लोकांच्या जीवाशी खेळ करीत आहोत.

श्रीमती मेहरून्नीसा खान: बर्फचे कारखाने अनधिकृत असतील, ज्यामूळे शहरातील नागरीकांना धोका निर्माण होवू शकते ते सर्व बंद करण्याबाबत कार्यवाही करावी.

श्री.निसार खान : माझ्या वार्डात पिण्याच्या पाण्यात चार पाच महिण्यापासून दुषीत पाणी येत असल्याने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले कार्य.अभियंता ड्रेनेज यांनी पाहणी केली.१.५० लक्षचे काम कलम ६७ (३) (क) मध्ये करण्याचे उर्वरीत काम टेंडर काढून कार्यवाही करावी असे मा.आयुक्तांनी आदेश केले मा.आयुक्तांची सही होवून दीड महिना झाला अदयाप पूढील कार्यवाही झालेली नाही. विचारणा केली असता तरतुद नसल्याचे संबधीत अधिकारी सांगतात.

श्री.सय्यद खुसरो :जो विषय चालू आहे त्यावर चर्चा व्हावी गॅस गळती बाबत खुलासा घ्यावा.

मुख्य अग्निशमन अधि. :पहिल्या वेळेस गॅस लिकीज झाला त्यावेळी सदरीत कारखान्यास धोकादायक घोषित करून संबधीत पोलीस स्टेशन ,परवाना विभाग पोलीस आयुक्तालय तसेच संबधीत फॅक्टरी निरीक्षकास कळविण्यात आले होते. अग्निशमन विभागाने त्यास परवानगी दिलेली नव्हती. दुस-यांदा जेंव्हा घटना घडली तेंव्हा त्यांचेवर पोलीस कार्यवाही होत नाही म्हणून मा.आयुक्तांच्या सुंचनेनुसार पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला. जुनाबाजार सह चार कारखाने असून उर्वरीत तीन कारखाने एमआयडीसी भागात आहे.

श्री.नासेर नाहदी :एक महिण्यापूर्वी गॅस गळतीची पहिली घटना झाली त्यात अनेक लोक ॲडमीट करावे लागले. संबधीत अधिकारी यांनी स्थळ पाहणी केली त्यास सिल होवून रेकॉर्ड बघून पुढील कार्यवाही होईल अशी अपेक्षा होती सदर कारखान्यास परवानगी नाही असे असतांना पहिली घटना घडली त्यावेळेस सील का केले नाही. दुस-या वेळेसचा प्रकार झाला नसता.

मुख्य अग्निशमन अधि. :पहिल्यांदा घटना झाली तेंव्हापासून सदर कारखाना बंद होता दुस-यांदा जेंव्हा दुर्घटना घडली तो कॉईन मधील गॅस लिकीज झालेला आहे.

श्री.सय्यद खुसरो :धोकादायक असल्याचे जेंव्हा जाहीर केले तो कारखाना अनाधिकृत होता त्याच वेळी सील लावणे आवश्यक होते. ते न लावल्यामूळे पुन्हा घटना घडली जे जबाबदार असतील त्यांना निलंबीत करावे.

मा.आयुक्त :बर्फच्या कारखान्यास फॅक्टरी सेफ्टी हेल्थ ॲक्ट नुसार परवानगी ही शासनाची असते. महापालिका अग्निशमन विभागाची एनओसी घेणे आवश्यक आहे तसेच जे पाणी वापरले जाते ते पिण्यास योग्य आहे की नाही या दोन्ही बाबी तपासणी करावयास पाहिजे. पहिल्यांदा घटना घडली त्यांना गॅस वगैरे बाजूला करून दुस-यांना होवू नये म्हणून पोलीस तसेच परवाना विभागास कळविण्यात आले

होते. तेंव्हापासून कारखाना बंद होता परंतू कॉइलमध्ये असलेला गॅस लिक होवून पुन्हा घटना घडली

श्री.सय्यद खुसरो :जेव्हा घटना घडली तेंव्हा ७५ के. जी वजनाचा गॅस होता अधिकारी सभागृहाची दिशाभूल करीत आहे त्वरीत ॲक्शन घेण्यात यावी.

मा.आयुक्त :पहिल्यांदा जेंव्हा गॅस सिलेंडर बाजूला केले त्याच वेळी कॉईलमधील गॅस काढून टाकला असता तर घटना घडली नसती. सुरूवातीच्या वेळेस फॅक्टरी ॲक्ट प्रमाणे कळविले होते. दुस-यांदा जेंव्हा घडले तेंव्हा संबधीतावर पोलीसात गुन्हा दाखल केला आहे. दुस-यांदा परवानगी दिली जाणार नाही.घटना स्थळी व कॉईलमध्ये कुठेही गॅस असणार नाही याची दखल घेतली जाईल.गॅस सिलेंडर काढले त्यावेळी लक्षात यायला पाहिजे होते.

श्री.सय्यद खुसरो : भोपाळ दुर्घटना १० कि.मी.मध्ये परिणाम झाला. आज ही गॅस सिलेंडर सदर कारखान्यात लागलेले आहे. गंभीर बाब आहे.

श्री.नासेर नाहदी : दुस-यांदा गॅस गळती होवून दुर्घटना घडली याचा अर्थ सिलेंडर काढलेले नव्हते. सध्या तेथे आहे.

मा.आयुक्त :सीलेंडर आहे की नाही याची चौकशी करण्यासाठी लगेचच अधिका-यांना पाठवू. असेल तर फॅक्टरी सेप्टी हेल्थच्या ॲक्ट नुसार शासनास संबधीत विभागास सील करण्याचे कळविले जाईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : कारखाना बंद व्हावयास पाहीजे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :परवानगी कुणी दिली.

मा.आयुक्त :ज्यांना परवानगी देण्याचे अधिकार आहे त्यांना व पोलीस विभगास सुध्दा हे धोकादायक असल्याचे कळविले आहे.आता तेथे सिलेंडर असेल तर त्याची चौकशी करून इतर ठिकाणच्या कारखान्यातही २४ तासाच्या आत िटम तपासणी करील.

श्री.सय्यद खुसरो : अग्निशमन दल कशासाठी आहे. घटना घडल्यानंतर ४ दिवसांनी कार्यवाही झाली. मी स्पॉटवर होतो. आपणांस कॉल केला होता, आपले डॉक्टरांनी काही मदत केली नाही. रूग्णानां औषधी देण्यात आलेली नाही.

मा.आयुक्त :पुर्णच्या पुर्ण घाटीमध्ये ॲडमीट केले होते तेथेच औषधी मिळते. महापालिकेच्या डॉक्टराची टिम सुध्दा रात्री १२-०० वाजेपर्यंत कार्यरत होते.

श्री.संजय जोशी :प्रत्यक्ष ठिकाणी सध्याची परीस्थिती काय आहे. यासाठी एक टिम नेमावी २४ तासाच्या आत त्यांनी पाहणी करून अहवाल देण्याचे आदेशीत करावे.

डॉ.भागवत कराड :या संदर्भात अगोदर चौकशी करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा. महापौर : सदर प्रकरण हे अतिशय गंभीर असून या संदर्भात मा.आयुक्त यांनी चौकशी करावी. जे धोकादायक कारखाने असेल ते बंद करण्या बाबतची कार्यवाही करावी.संबधीतांना तसे कळवावे. जो वापर आहे तो अनुज्ञेय आहे की नाही सहा. संचालक नगररचना यांनी चौकशी करावी. तेथील पाण्याचे सॅम्पल तपासणी करून ते

पाणी पिण्यास योग्य आहे की नाही, धोकादायक असेल तर बंद करावे. या सर्व बाबतीत चौकशी करून २४ तासाच्या आत कार्यवाही करून जे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :सिडको भागात प्रत्येक वार्ड सेक्टरमध्ये कमी दाबाने पाणी येते व वेळेवर पाणी येत नाही १ तास नंतर ४५ मिनीटे व सध्या ३५ मिनिटे पाणी येत आहे. उन्हाळयाचे दिवस आहे कमी पाणी दिल्या जात असल्याने तेथील नागरीक त्रस्त झालेले आहे. सिडकोचा पाणीपूरवठा १९८४ मध्ये महापालिकेकडे हस्तांतरण झाले शहरात काही भागात दररोज पाणी तर सिडको भगात गेल्या पाच वर्षापासून एक दिवसा आड पाणी देत असूनही तो पुरेसा नसून कमी दाबाने दिला जातो असा दुजाभाव प्रशासन का करीत आहे.पाणी पटटी मात्र पुर्ण वर्षाची घेतली जाते. कोणत्या भगात कोणत्या टाकीवरून पुरवठा होतो याचे नियोजन आसेल तर तसा खुलासा करावा. जायकवाडी पासून ११० तर हर्सूल मधून ५ एमएलडी पाणी येत असतांना जाते कूठे, सिडको भागात ३२ हजार नळ कनेक्शन आहे. ज्या प्रमाणात पाणी दयायला पाहिजे ते मिळत नाही. पाणी जाते कुठे याचे नियोजन असावयास पाहिजे. जे पाणी येते सर्व नागरीकांना समान वाटप व्हावे. पाणी येते किती सिडको साठी किती व शहरासाठी किती एमएलडी पाणी दिले जाते या विषयी आता ताबडतोब माहिती द्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एकाच शहरात राहणा-या नागरीकांना पाणी पुरवठा देण्यात दुजाभाव करण्यात येतो असे राज्याच्या कोणत्याच शहरात नसेल.सर्व शहराला दररोज पाणी दिल्यास न्याय मिळेल हे होत नसेल तर समान पाणी वाटप करावेत. हेही होत नसेल व ज्या भागात एक दिवसाआड पाणी म्हणजे सहा महिने पाणी दिले जाते त्या नागरीकाकडून ६ महिण्याचीच पाणी पटटी घ्यावी. सर्वांना सारखा न्याय दयावा.

श्री.निसार खान :३-४ महिण्यापासून निदर्शनास आणून देत आहे की माझ्या वार्डात पिण्याच्या पाण्यात ड्रेनेजचे पाणी येत आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार केले मा.आयुक्तांची स्वाक्षरी झालेली आहे. दीड महिना झाला विचारणा केली असता तरतुद नसल्याचे सांगण्यात येते.

श्री.काशिनाथ कोकाटे :पिण्याचे व ड्रेनेजचे पाणी एकत्र होत असेल व आरोग्यास धोका निर्माण होतो ही बाब निदर्शनास आल्यानंतरही काम करण्यास वेळ लागत असेल तर ६७ (३) (क) खाली ते काम करावयास पाहिजे होते. अशा आवश्यक कामासाठी तरतुद नाही असे उत्त्तर देणे योग्य नाही.देखभाल दुरूस्तीचा निधी वळती करून काम करता येते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:लेखाशिर्षक बदलून घ्यावे काम करणे आवश्यक असल्याने कार्योत्तर मंजूरी दयावी. ड्रेनेजचे पाणी येते अशा कामाकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

मा.आयुक्त : ९ ते १० लक्षचे काम होते. उर्वरीत रक्कमेचे काम विना टेंडर करणे योग्य वाटले नाही. म्हणून केले नाही. त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागेल. १.५ लाख खर्च केलेला आहे.

४ महिण्यापासून प्रोसेस मध्ये होते. आता ३ किंवा ७ दिवसाचे शॉर्ट टेंडर काढून कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहे.लेखा शिर्षक बदलण्यासाठी प्रस्ताव येईल अशी अपेक्षा होती. ते करून घ्यावे.बजेटमध्ये तरतूद करून देण्याचे आश्वासन दयावे उदयाच तीन दिवसात कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :बजेट मध्ये तरतुद उपलब्ध करून त्वरीत ते काम करण्यात यावे.

श्री.भाऊसाहेब ताठे :सन २००१ मध्ये सर्व पदाधिकारी व प्रशासन मिळून बैठक घेवून चार महिण्यासाठी सिडको भगात एक दिवसा आड पाणी देण्याचा निर्णय घेतला परंतू तेव्हापासून आजपर्यत एक दिवसा आड सहा महिणेच पाणी येते. आम्हास दररोज पाणी दयावे नसता सर्व भागात एक दिवसा आड पुरेसे पाणी दयावे. एक्सप्रेस लाईन पासून सिडकोला फायदा झालेला नाही. उपाय योजना करावी. सिडको पाणीपुरवठा उपअभियंता कार्यालयात थांबत नाही. त्यांची बदली करावी.

श्री.कवरसिंग बैनाडे :एन -५ भागातील ४२ व्यावसाय करतात. वर्षाला ६५०० रू. कमर्शियल दराने पाणीपटटी भरणा करीत होते मुख्य लाईन वरून नळ कनेक्शन होते पुर्व सुचना न देता नळ बंद केले. असून पुर्ववत नळ कनेक्शन जोडणी करून देण्याची मागणी करीत आहे कार्यवाही केली जात नाही.यापासून महापालिकेला उत्पन्न मिळणार आहे.

मा.आयुक्त :मुख्य लाईनवर कुणालाही कनेक्शन दयायला नको कारण त्यावर २४ तास पाणी असते ते कन्ट्रोल करू शकत नाही त्यासाठी जे मुख्य लाईनवर कनेक्शन असतील ते साईडच्या लाईनला कनेक्ट करायला पाहिजे. साईडला ब्लॉक करून दयायला पाहिजे. मुख्य लाईनवर २४ तास पाणी असते.

श्री.कवरसिंग बैनाडे :पॅरलल लाईन आहे मुख्य लाईन नव्हती चार सेक्टरसाठी पाणी जात होते त्यामूळे चार तास पाणी मिळत होते ते एक दिवसाआड व्यावसायिक दराने ६५०० रू. वर्षाला भरणा करीत होते.सात वर्षापासून नळ कनेक्शन होते १५ दिवसापूर्वी पुर्व सुचना न देता नळ बंद केले एक आठवडा पाणी मिळाले नाही.

मा.आयुक्त :सर्वाना समान पाणी मिळावयास पाहिजे. मुख्य लाईनवर इतर ठिकाणी पुरवठा होतो त्यावेळी या लोकांना सतत पाणी येत असेलच ते बंद करू शकत नाही.

श्री.कवरसिंग बैनाडे :व्यावसायिकांना हॉटेल यांना मुख्य लाईनवरून नळ कनेक्शन दिले जाते हे लोक व्यावसायिक प्रमाणे पाणीपट्टी भरण्यास तयार आहे देण्यास हरकत नसावी.

मा. आयुक्त :पाणी वाटप करतांना सर्वांना समान मिळावे मुख्य लाईनवर जे ही कनेक्शन असेल ते काढून साईड लाईनवर दयायला पाहिजे. या संदर्भात चौकशी करून कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :या बाबत प्रशासनाने संबधीत अधिकारी यांना बरोबर घेवून पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी.

सौ.पुष्पा शिंदे :संपूर्ण शहरात समान पाणी वाटप करावे. गुंठेवारी भागात एक दिवसाआड टँकरद्वारे पाणी दिले जाते ड्रम मागे ४५०रू आकारणी

होते ते २०० रू. करण्यात यावे तसेच या भागात पाण्याची लाइेन टाकण्या बाबत कार्यवाही व्हावी.

सौ.मोमीन सोफिया फिरदोस:माझे वार्डात व बाजूच्या वार्डात एकाच टाकीवरून पाणीपूरवठाहोत असतांना माझे वार्डात एक दिवसाआड कधी दोन दिवसाआड पाणी कमी दाबाने येते. बाजूच्या वार्डात तीन वेळेस पाणी पुरवठा होतो असा दुजाभाव का? दोन वर्षापासून पत्र देत आहे कार्यवाही केली जात नाही.

मा.आयुक्त : काही लोकांना डिस्ट्रीब्युशनच्या मेन लाईनवर कनेक्शन दिले जाते ज्यावेळी पाणी सोडवून दुस-यांना दिले जाते त्यावेळी त्यांनाही मिळते.त्यासाठी मुख्य लाईनवर जे कनेक्शन आहे ते बंद करून डिस्ट्रीब्युशनच्या लाईन वर कनेक्शन देणे गरजेचे आहे. या संदर्भात संबधीत अधिकारी यांना त्या लाईनचा प्लॅन मध्ये बदल करण्या बाबत माहिती घेण्याच्या सुचना दिल्या जातील. माहिती घेण्याचे सुचना देवून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे : शहराच्या मध्यभागात चार टाक्या असूनही टंचाई आहे.आणखी दोन नवीन टाक्या बांधण्या बाबत प्रोव्हीजन करावी त्या शिवाय पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. अनेक ठिकाणी फ्लॅट सिस्टीम आहे. मोठया लाईनवरून या लोकांनी नळ कनेक्शन घेतले खालचे सर्वसामान्य लोकांना पाणी मिळत नाही अशी परीस्थिती आहे.

श्री.अ.रशिद खान :एक दिवसा आड पाणी देवून पुर्ण वर्षाचा टॅक्स घेणे योग्य नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : १ दिवसात २ दिवस पुरेल इतक पाणी देतात.

श्रीमती जयश्री किवळेकर : अनेक वेळा चर्चा झाली सिडकोतील पाणीपुरवठया संदर्भात ठोस निर्णय झाला नाही. २००१ मध्ये मध्ये चार महिण्यासाठी एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय घेतला तो अदयापही कायमच आहे.हस्तातंर होवून दोन वर्ष झाले अनेक समस्यां वाढलेल्या आहे प्रशासनही यास जबाबदार आहे. काही भागात दररोज पाणी दिले जाते त्या प्रमाणे सिडको भागातही देण्याचे आदेशीत करावे.किंवा एक दिवसा आड पाणी देणार असेल तर सहा महिण्याचे बिल घ्यावे. ईटेंडरींग पीएमसी तसेच खाजगीकरणासाठी या शहराचे नाव लौकिंक करणारे मा.आयुक्त यांनी तीन वर्षात सिडको भागात सुरळीत पाणीपूरवठा देण्यासाठी काय प्रयत्न केले आहे.

श्री.मिलींद दाभाडे : काही भागात दररोज पाणी तर काही भागात एक दिवसा आड पाणी देण्याचे कोणत्या निकषानुसार केले. माझ्या वार्डातही दिवसा आड पाणी येते. पुरेसे पाणी येत नाही. प्रशासनाने हा भेदभाव त्वरीत थाबवावा. १५ वर्षापासून सत्ता असतांना जनतेचा पाणीप्रश्न सुटला नाही ही खंत आहे.अनेक भागात एक दिवसा आड येते ते ही पुरेशे नाही. सर्वांना दररोज पाणी दयावे नसता जेथे एक दिवसा आड पाणी दिले जाते तेथे सहा महिण्याचीच पाणीपटटी आकारावी.पाण्याचा गंभीर प्रश्न असून लवकरात लवकर सोडवावा नसता जनअंदोलन करून हा प्रश्न आम्ही सोडवू.

श्री.शंशाक विसपूते :आम्ही ज्या भागात राहतो तेथे एक दिवसाआड पाणी येते. काही सोसायटीज २० वर्षापासून अधिकृत असून रेग्यूलर टॅक्स भरणा करतात तेथे पाणी नाही.त्या सोसायटीज नंतर जे बिल्डरांनी विकास केला त्या भागात मुबलक पाणी आहे. ज्या ठिकाणी दररोज पाणी येते तेथे व इतर भागात एक दिवसा आड पाणी दिले तर पिण्यापुरते पाणी तरी मिळेल यामूळे नागरीक समाधानी होतील

सौ.अजरा जबीन : दिल्लीगेट कडून हत्तीसिंगपूरा भागाकडे लाईन रात्री फुटली होती. ती जोडणीसाठी दीड वाजेपर्यत त्या साईजचा पाईप मिळत नव्हता. अशा आपत्कालीन परीस्थितीत प्रशासन काय उपाययोजना करू शकते. एक दिवसाआड म्हणजे सहा महिणे पाणी देवून पुर्ण वर्षाची पाणीपटटी घेणे योग्य नाही. पाणी वेळेवर येत नाही. प्रशासनाचे कोणतेही नियोजन दिसून येत नाही याची गंभीरतेने दखल घ्यावी.अनेक वेळा पाणी लिकेज होते ड्रेनेजचे पाणी येते याची दुरूस्ती ताबडतोब व्हायला पाहिजे.

सौ.पार्वती वाघमारे :हनुमान नगर ते गजानन नगर पर्यतची ३० फुट लाईन टाकणे बाकी आहे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. तेथील ४० लोकांनी टॅक्स भरणा केलेला आहे. नवीन काही भागात पाणी सोडण्यात आले सदर लाईन १५ वर्षापूर्वीची जुनी आहे.एक गल्लीत पाणी येते तर दुस-या नाही. श्री.मिश्कील दुय्यम आवेक्षक यांना पाहणी करण्याचे प्रशासनाने आदेशीत केले होते मी स्वत: अनेक वेळा दुरध्वनी वरून संपर्क सांधला परंतू त्यांनी अदयाप पाहणी केली नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे :सर्वांना समान पाणी मिळावे यासाठी निवेदने दिली आहे.एक तर सर्वच भागात रेग्यूलर दररोज पाणी पुरवठा करावा नसता सर्वच ठिकाणी एक दिवसाआड पाणी पुरवठा करावा जेथे एक दिवसाआड पाणी दिले जात असेल त्यांचेकडून सहा महिण्याची पाणीपटटी आकारणी करावी.

श्री.देसरडा प्रशांत :शहरात १३० एमएलडी पाणी येते. ११० एमएलडी म्हणजे ११ हजार कोटी लिटर पाणी येते. शहराची लोकसंख्या १० लक्ष एका व्यक्तीला नियमानुसार १५० लिटर पाणी दिले तरी १५ हजार कोटी लिटर होते एक दिवसा आड म्हणजे ७५००हजार कोटी लिटर पाणी होते.काही भागात दररोज पाणी देत असल्याने दोन कोटी मिळवले तर ९५०० कोटी लिटर होते. उर्वरीत ११ हजार कोटी लिटरर्स पाणी कुठे दिले जाते. बाष्पीभवन होते. याचा अर्थ नियोजन असेल तर दररोज नागरीकांना पाणी मिळू शकते.समान पाणी वाटप होण्यासाठी ऑडीट करावे. एजन्सी असेल तर आणावी.

सौ.संगिता जाधव : न्यु हनुमान नगर भागात पाणी देतो, तेथे पुंडलिकनगर टाकीवरून येणारे पाणी बंद झाले. पुंडलिकनगर टाकीतून एक वर्षापासून पाणी सोडले आहे १ ते १३ गल्लीपर्यत कमी दाबाने तसेच १०-२० मिनिटे पाणी येते. उन्हाळयाचे दिवस असून एक तास पाणी दयावे.

सौ.सरला पोळ : एक दिवसा आड पाणी तेही ३० मिनिटे येते. नागरीक आम्हा नगरसेवक म्हणून जाब विचारतात. नियोजन करून पुरेशे पाणी

देण्याचा निर्णय घ्यावा नसता नागरीक आम्ही मोर्चा घेवून येवू याची नोंद घ्यावी.

श्री.विनायक पांडे :पहाडसिंगपूरा तसेच विदयापीठ टाकीवरून माझे वार्डात पाणीपूरवठा होतो. पहाडसिंगपूरा टाकी ग्रॅज्युटीने भरली जाते दोन ते अडीच मीटर पाणी येते. पाणी पुरवठा करणेसाठी अधिकारी प्रयत्न करतात. नागरीकांना पुरेसे पाणी मिळत नाही तो सुरळीत व्हायला पाहिजे.

सौ.लता दलाल :अनेक वेळा पाणीपुरवठा संबधी चर्चा होते आजही होत आहे. वार्डातील नागरीकांनी आम्हाला निवडणून दिले त्याचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी येथे आलेलो आहोत.वोर्डातील सर्वच प्रश्न सर्वच सदस्यांना सारखेच आहे.किती पाणी येते व किती वाटप व्हायला पाहिजे कुठेतरी प्रशासनाचे चुकते आहे हे स.सदस्यांनी निदर्शनास आणून दिले अनेक भागात मोठमोठी बांधकामे चालू आहे याना पाणी कोठून घेतात याची चौकशी केलेली आहे का? अनेक अधिकारी कर्मचारी त्यात लाईनमनही असतील हे नव्याने आलेले आहे त्यांना पाण्याच्या लाईन माहित नाही अशा अनेक तृटी पाणीपूरवठयात आहे. वाया जात असलेले विना मुल्य जाणारे पाणी ज्यांना गरज नाही असे जाणारे पाणी कूठे आहे याचा शोध ध्यावा. सर्वच भागात एक दिवसा आड पाणी दयावे किंवा सहा महिण्याचा टॅक्स घ्यावा हा उपाय होवू शकत नाही दररोज पाणी मिळू शकते वाया जाणारे पाणी याचा वापर जनतेला व्हावा. प्रशासनाने नियोजन करावे.सिडको भागातही हिच परीस्थिती आहे.ज्या तृटया असतील त्या दुर करून दररोज पाणी दयावे. संबंधीत कर्मचाऱ्यांना जलवाहीनी कशी जाते माहित नाही. वितरण व्यवस्थेत गोंधळ आहे. जुने नगरसेवक व जुने लाईनमन यांना अभ्यास आहे. सिडकोची ही तीच परिस्थिती आहे. दररोज पाणी द्यावे.

श्री.कचरू मोरे :बांधकाम परवानगी देतांना त्यासाठी लागणारे पाण्याचा विचार न करता परवानगी दिली जाते.उन्हाळा सुरू झाला अनेक गरीब वसाहतीत पुरेसे पाणी दिले जात नाही. जेथे दररोज पाणी दिले जाते त्या भागासह इतर सर्व भागात एक दिवसाआड सर्वांना समान पाणी वाटप करावे.काही वार्डात दररोज पाणी तर काही भागात एक दिवसाआड पाणी हा भेदभाव का केला जात आहे.

सौ.कला बोरामणीकर :महिला विधी महाविदयालयाच्या बाजूला पाण्याची टाकी करण्यासाठी तरतूद केलेली होती. प्रशासनाने तेथे पाहणी केलेली आहे. तसेच शहरात अनेक पाणी असलेल्या विहिरी असून त्या पाण्याचा वापर कसा करता येईल यासाठी उपाययोजना करण्यात यावी. जुन्या विहीरींचा उपसा नाही. पिण्याच्या पाण्यास मिटर बसवावे जेणे करून कोण किती पाणी वापरतो हे दिसून येईल.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :काही भागात लिगल सोसायटीज असून उंचावर असून दररोज पाणी येत परंतू कमी दाबाने येते.तेथील नागरीक जास्त दाबाने पाणी देण्या बाबत सदस्यांकडे मागणी करतात याचीही दखल घ्यावी.

वितरण व्यवस्था सुधारावी. पाण्याचे ॲडीट व्हावे. सर्वांना समान पाणी मिळेल याची दखल घ्यावी.

मा.महापौर :पाणी पुरवठयाच्या संदर्भात पुरेशी चर्चा झालेली असून संपूर्ण शहराला व्यवस्थित पाणी पुरवठा करणे हे पहिले कर्तव्य महापालिकेचे आहे. पाणी पुरवठा करतांना ज्या तृटया आहेत त्यात सुधारणा करावी. प्रेशरने पाणी मिळेल याची काळजी घ्यावी. तसेच पाण्याचे नियोजन करण्यात यावे. शहरात किती पाणी येते किती डिमांड आहे व किती पाणीपुरवठा केला जातो याचे ऑडीट करण्यात यावे. शहरातील सर्व जनतेला ं सुरळीत तसेच नियमीत व समान पाणी वाटप होईल याची काळजी प्रशासनाने घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जकात संदर्भात सहकार एजन्सी तसेच मेडीसीन व्यापारी याचा दराच्या बाबतीत वाद चालू आहे. कोणत्या दराने जकात घेत आहे. शहरात औषधाची टंचाई आहे.रूग्णाचे हाल होत आहे. या संदर्भात प्रशासनाने व संबधीत एजन्सी व व्यापारी यांचे सोबत बैठक घेवून योग्य तो मार्ग काढावा. पदाधिकारी यांची मदत लागत असेल तर घ्यावी. चांगला मॅसेज जाईल. सहकार एजन्सीमूळे जास्त बदनामी झाली. प्रशासकीय स्थरावर सर्वांना बोलावून प्रश्न सोडवावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :हा ज्वलंत प्रश्न असून सहकार एजन्सीला महापालिका जाणूनबजून मदत करीत आहे असे चित्र निर्माण झाले कायदयानुसार एमआरपी नुसार किती जकात आकारली पाहिजे संबधीताची समजूत घालावी मार्ग काढावा एजन्सी जास्त आकारणी करीत असेल तर ताकीद दयावी कर्मचा-यांना लक्ष देण्याची गरज आहे. वाद कशाबध्दल आहे सभागृहाला माहिती दयावी.

सौ.संगिता जाधव :वृत्तपत्रात आले की सहकार एजन्सी मा. आयुक्तांच्या आर्शीवादाने मनमानी करते. जकात वसूल करत असतांना गप्प का, सरकारी एजन्सीच्या मिठाला जगण्या पेक्षा स्वाभीमानाने जगा, १९ तारखेच्या सर्वसाधारण सभेला वस्तुचे टॅक्स इनव्हाईज असून त्या वस्तूच्या खरेदी किमतीला जकात आकारावा परंतु ज्या मालाचे बील नाही चुकीचे बिल आहे असे सिध्द झाल्यास दहा पट दंड आकारून ती रक्कम महापालिकेच्या तिजोरीत जमा करण्याचा ठराव घ्यावा.शहरात येणा-या मालावर, खरेदी किमतीच्या अधारावर जकात आकारणे संदर्भात निर्णय घ्यावा. बील नसेल चुकीचे असेल तर विक्री किमतीवर २० टक्के वजा करून जकात आकारावी आतापर्यंत सहकार एजन्सीने टॅक्स इन्व्हाईसवर २ ते ५ पट वाढवून जकात आकारली ती १० पट दंड आकारून व्याजासह सहकार एजन्सीकडून वसूल करून विकासासाठी वापरावी. एजन्सीचे तिजोरी भरण्याचे काम थांबवावे व्यापा-यांनी खरेदी किमतीच्या आधारे विक्री करण्याचे मान्य केले आहे तरी आयुक्तांना स्वाभीमानी सेनेचा निर्वानाची इशारा आहे की शहरातील नागरीकाच्या न्याय हक्कामध्ये निर्णय घेवून खरेदी किमतीच्या अधारे जकात आकारण्याचा आदेश सहकार एजन्सीला दयावे होत असलेला त्रास थंबवावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :जकात वसुली तीन वर्षापासून एजन्सी करीत असून तेंव्हापासून प्रशासन, बॉडीतील सदस्य तसेच एजन्सी तीच आहे. व्यापारीही तेच आहे महापालिकेचे जकात अधिक्षक तसेच उपआयुक्त यांचे चूकत असेल तर कार्यवाही करावी. चुक कुणाची आहे तपासणी करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी या बाबत आजच्या आज योग्य तो मार्ग काढावा.

मा.महापौर :या बाबतीत प्रशासनाने आतापर्यत काय कार्यवाही केली खुलासा करावा.

मा. आयुक्त औषधीवर नव्हे तर सर्वच सेक्टरसाठी २-३ वर्षापासून MRP- २०% प्रमाणे जकात आकारणी होते. फक्त फटाकेवर ३०% आहे. औषध हे MRP च्या रेट मध्येच मिळते त्यामुळे पूर्वीच्या रेटप्रमाणेच आकारणी होत आहे. जो मागील ७-८ दिवसापासून व्यापाऱ्यांनी औषध विक्री बंद केली. प्रशासनाचे ठामपणे असे मत आहे की, सदर औषधी विक्रेते वेठीस धरून महानगरपालिकेला ब्लॅक मेल करण्याचा प्रयत्न करीत आहे. करामध्ये कोणताही प्रकारचा बदल झ ाला नाही. MRP मध्ये जे किमंत लावतात त्याच्यात अंतर असेल तर MRP मायनस करून २०% प्रमाणे घेतो कोणाचे काही म्हणणे असेल तर न्यायालयात जाऊन दाद मागू शकतात. नागरीकांना वेठीस धरून प्रशासनाला ब्लॅक मेल करण्याचा प्रयत्न करू नये असे आव्हान करण्यात येते. जे काही तीन ते चार केसेसमध्ये ३ ते ४ पट झालेले ते चार पाच बिल ज्यांनी दिले त्यांना २ वेळा हेरींगसाठी बोलविले ते आले नाही. पुन्हा बोलावले ठेकेदाराची चुक असेल तर रद्द केले जाईल. फॅमीली प्लॅनींगच्या बाबतीत जे निरोध वर जकात लावता येत नाही लावणे योग्य नाही. ती लागलेली आहे. अशा दोन केसेस दाखवल्या त्यांनाही हेरींगसाठी बोलविले नुसते क्लेम करणार हेरींगसाठी येणार नसेल तर काय करू शकतो. पुन्हा एक संधी म्हणून काल नोटीसेस देण्याच्या सुचना केलेल्या आहेत. इतर महापालिकेत एमआरपीवर लागू आहे. आपले सीस्टीम २-३ वर्षापासून २०% नफा गृहीत धरून तो वजा करून जकात लावतो. ज्यांना क्लेम करायचा त्यांनी कायदेशीर दाद मागवावी कायदयानुसार जो काही निर्णय राहिल तो सर्वांना मान्य राहील.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर :यात महापालिकेचा रोल काय आहे इतर महापालिकेत काय पध्दत आहे. दोन वर्षानंतर हा प्रश्न का ऐराणीवर आलेला आहे. जे नाक्यावर कर्मचारी आहे त्याची किंवा व्यापा-याची एजन्सी बरोबर वागणूक चांगली होत नसेल. हे कारण असू शकते. यात महापालिका बदनाम न होता खरे कारण शोधाचे कायदयानुसार जे दर असतील ते घ्यावेच लागणार आहे. इतर महापालिकेकडून माहिती घेवून त्याप्रमाणे आकारणी करावी.

श्री.प्रशांत देसरडा :औषधीवर एमआरपीवर २० टक्के लेस या प्रमाणे जकात आकारतो ते व्यापा-यांना मान्य नाही. हा प्रश्न गंभीर होत असून दुकान मधील स्टॉक संपलेला आहे. इतर महापालिकेत औषधीवर किती जकात आकारणी होते दुरध्वनीद्वारे माहिती करून घ्यावी. मेजर

महापालिका जो निर्णय घेत असेल तो या महापालिकेने घ्यावा. व्यापारी हे शहराचे नागरीक आहे व्यापारी व प्रशासन यांची आपण महापौर या नात्याचे एकत्रीत बसून योग्य तो मार्ग काढावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :व्यापारी सुध्दा प्रतिष्ठित नागरीक आहे त्यांचे चुक होत असेल तर समजावून सांगावे. अधिकारी व्यापा-यांना चांगली वागणूक देत नाही अंगावर धावून जातात हे बरोबर नाही.

श्री.अ.रशिद खान :या बंद मुळे गरीब नागरीकांना त्रास होत आहे. औषधी संदर्भात उदया वेगळा वाद निर्माण होईल. गुंडागर्दी करणे प्रशासनाला हाताशी धरणार यात प्रशासन व महापालिकेची बदनामी होत आहे.रेट कमी करण्याचे अधिकार या सभागृहाला आहे का, व्यापा-याची रास्त मागणी असेल तर मा. न्यायालयात दाद मागवू शकतात.

मा.महापौर :जकात मेडीसिन हा विषय गंभीर असून मेडीसीनची दुकाने बंद होती. या संदर्भात संपूर्ण सभागृह व अधिकारी हे सर्व एका विचाराने काम करतात अशीच भुमिका सगळयाची आहे. या संदर्भात इतर महापालिकेत कशा पध्दतीने टॅक्स वसूल केला जातो याची माहिती त्वरीत घ्यावी.शहरातील नागरीक व व्यापारी हे आपले नागरीक आहे म्हणून त्यांचे चर्चा करून मार्ग काढावा.

श्री.देसरडा प्रशांत : सर्व पदाधिकारी प्रशासन बसून योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर : या संबधी प्रशासनाने एक बैठक आयोजित करावी व त्यात मार्ग काढावा.

सौ.लता दलाल :ज्या कर्मचा-यांना १२ वर्ष पूर्ण झालेले आहे त्यांना समयवेतनश्रेणी देण्या संदर्भात माझ्या माहिती प्रमाणे मा.आयुक्त यांची सही झालेली आहे का थांबवून ठेवलेले आहे. आदेश का निर्गमित होत नाही.

श्री.संजय जोशी :आजच्या आज ऑर्डर देण्याची कार्यवाही करावी.

मा. महापौर :सर्व ऑर्डर तयार कराव्यात आजच्या आज देण्याची कार्यवाही करावी.

श्री.अ.रशिद खान :शहरात मच्छर मोठया प्रमाणात झालेले असून नागरीकांना त्रास होत आहे. दोन वर्षापासून एकच औषधी फवारले जात आहे दुसरे परीणामकारक औषधी विकत घ्यावी.

मा.महापौर :शहरात मच्छर मोठया प्रमाणात झालेले आहेनवीन औषधी डास निर्मुलनासाठी` त्वरीत घेण्यात यावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर :अधिका-यांच्या चुकीमूळे माझे वार्डात दोन गटात तणाव निर्माण झ ाला चुकीच्या पध्दतीने एनओसी दिलेली आहे. सोसायटीने ज्या कारणासाठी आरक्षण ठेवले आहे ते काम सफल होत नाही व वेगवेगळे कामासाठी तेथे प्रोसेस होते. दिंनाक २९-९ रोजी ठराव घेतला होता उशीरा कार्यवाही होत असून बॅडमिंटन हॉलचे काम असून अंदाजपत्र्क तयार होवून टेंडरसाठी गेलेले आहे. १०-१५ दिवसात निपटारा झाला नाही तर राजीनामा देवून आत्महत्या करणार आहे याची नोंद घ्यावी. २९.०९ च्या ठरावात बॅडमिंटन हॉलचा समावेश आहे. एन.ओ.सी. चूकीचे दिले. ज्या कारणासाठी ठेवले ते होत नाही. विनंती की वार्डातील नागरीकाना येवून आपण

भेटावे त्यांचे समस्या दुर करावे व बॅडमिंटन हॉलचे काम लवकरात लवकर सुरू करावे

मा.महापौर :.मा.आयुक्त यांनी हे प्रकरण बघावे.

मा.आयुक्त : स. सदस्य यांचे वार्डात बँडमिटन हॉल साठी टेंडर काढले होते स्थायी समितीची मान्यता घेतली होती. संबधीतास २ टक्के रक्कम भरण्याचे पण आदेशीत केले होते. दरम्यान मध्ये सर्वसाधारण सभेने तो बॅडमिन्टन हॉल रद्य केला व सामाजिक सभागृह बांधण्याचे मंजूर केले. आता बॅडमिन्टन हॉल पाहिजे असेल तर त्यात दुरूस्ती करून घ्यावी.

**<u>विषय क्र. १६४ :</u>**

दिनांक १८.०१.२००८ व दिनांक ३१.०१.२००८ रोजी (दिनांक १८.०१.२००८ ची तहकूब सभा) संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.नारायण कुचे :दिनांक १८.०१.२००८ रोजी काही नगरसेवकांनी सुचक व अनुमोदक म्हणून विनंती अर्ज केला होता. ते इतिवृत्तात नांवे आलेले नाही. ती नावे घेण्यात यावी. इतिवृत्तांतात नांवे टाकून दुरूस्ती करावी.

मा.महापौर : आताच सांगितल्याप्रमाणे नगर सचिव यांनी इतिवृत्तात दुरूस्ती करावी.

दिनांक १८.०१.२००८ रोजी मा.महापौरांना दिलेले पत्र

दिनांक १८.०१.२००८ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजीत सर्वसाधारण सभेतील पुरवणी विषय क्र.९२ विषय क्र. ९३ चे आम्ही खाली सही करणार महापालिका सदस्यांनी सविस्तर वाचन केले.

विषय क्रमांक ९२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अधिक्षक अभियंता या संदर्भात श्हर अभियंता या पदाची निर्मिती (वेतनश्रेणी १२००० ते १६५००) करण्यासाठी शासनाकडे मंजुरीस्तव पाठविणे तसेच विषय क्रमांक ९३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, महानगरपालिकेत कार्यरत तीन कार्यकारी अभियंत्यांपैकी श्रीएस.डी.पानझडे, कार्यकारी अभियंता यांची सर्वात जास्त शैक्षणिक अर्हता आणि कार्यकारी अभियंता पदावरील त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना मिळालेली अतिरिक्त वेतनवाढ विचारात घेता त्यांची शहर अभियंता पदावर पदनामासह नियुक्ती करणे.

वरील प्रमाणे विषय क्रमांक ९२ व विषय क्रमांक ९३ मधील नमुद बाबींशी आम्ही खाली सही करणारे महानगरपालिका सदस्य सहमत आहोत व या दोन्ही प्रस्तावांना अनुमोदक म्हणून आम्ही राहू इच्छितो.

तरी दिनांक १८/०१/२००८ रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या पुरवणी विषय पत्रिकेतील विषय क्रमांक ९२ व विषय क्रमांक ९३ मंजुर करण्यासाठी आम्ही अनुमोदन देत आहोत व वृत्तांतात आमची नावे प्रस्तावाचे अनुमोदक
म्हणून नोंद घेण्यात यावी.

श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.किशोर तुलसीबागवाले, श्री.रेणुकादास वैद्य, श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.नासेर नाहदी मोहम्मद याहीया, श्री.रविंद्र गांगे, श्री.तरविंदरसिंग धिल्लन, सौ.लक्ष्मी शंकर आशन्ना, श्रीमती मसरद बेगम शरफोद्यीन, श्री.महेश माळवतकर, श्री.प्रकाश अत्तरदे, श्री.अनिल जैस्वाल, सौ.विमल बेंद्रे, श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान, श्री.जावेद हसन खान, श्री.संजु रिडलॉन, श्री.हाजी शेरखान अब्दुल रहेमान, श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस, श्री.खान निसार मोहम्मद खान, सौ.छाया राऊत, श्री.कंवरसिंग बैनाडे, श्री.अमोदी अबुबकर बिनसईद, श्री.अशरफ मोतीवाला, सौ.सरला सखाराम पोळ, श्रीमती खान जहुराबी नासेर, सौ.हर्षमाला पाटणी, श्री.विजय खुडे, श्रीमती मोमीन सफिया फिरदोस, श्री.दामोधर शिंदे, श्री.बन्सीलाल गांगवे, श्री.नारायण कुचे, सौ.शिंदे पुष्पा बाळू, श्री.शशांक विसपूते, श्री.प्रल्हाद निमगांवकर, श्री.सुरेंद्र कुलकर्णी, सौ.पार्वतीबाई वाघमारे, श्रीमती शमशाद बेगम शेख हफीज, श्री.रवि साहेबराव कावडे

श्री.संतोष जेजुरकर : विषय क्रमांक ९२ मध्ये सेवा नियमावली मध्ये स्थापत्य अभियांत्रिकी मधील
कोणतीही पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारास शहर अभियंता पदावर नेमणूक किंवा पदोन्नती देतांना प्राधान्य देण्यात यावे. अशी दुरूस्ती करण्यात यावी.

मा.महापौर : दुरूस्ती करण्यात यावी दुरूस्तीसह विषय क्रमांक १६४ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

दिनांक ३१.०१.२००८ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील इतिवृत्तात वर नमुद प्रमाणे विषय क्र.९२ व ९३ मध्ये अनुमोदक म्हणून स.सदस्यांच्या नावांची नोंद घेणे, आणि विषय क्र.९२ मध्ये शहर अभियंता या पदावर नियुक्ती/पदोन्नती देतांना स्थापत्य अभियांत्रिकी मधील कोणतीही पदव्युत्तर पदवी (Post Graduate) धारकांना प्राधान्य देण्यात यावे ईत्यादी दुरूस्तीसह व दिनांक १८.०१.२००८ व दिनांक ३१.०१.२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १६५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक १८/०२/२००६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेच्या ठराव क्रमांक १९७/२ अन्वये व कार्यालयीन आदेश क्र.मनपा/शिक्षण/२९४/०६ दिनांक २१/०४/२००६ अन्वये ३१ तत्कालीन शिक्षण सेवकांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून प्राथमिक शिक्षक या नियमित पदावर वेतनश्रेणी रू.४५००-१२५-७००० मध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच त्यांना दिनांक ०१/०५/२००६ पासून वेतन श्रेणीनुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

परंतू शासन निर्णय क्र.पीआरई/२००३/१३३३०(३४७२) प्रा.शि.१ शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई ३२, दिनांक ०९/०४/२००३ अन्वये शिक्षण सेवक कर्मचाऱ्यांनी तीन शैक्षणिक वर्ष पुर्ण झाल्यानंतर नियमित वेतन श्रेणीत नियुक्ती देण्याबाबत मार्गदर्शकतत्वे ठरवून देण्यात आलेली आहे. त्यामुळे खालील दर्शविलेल्या तत्कालीन शिक्षण सेवकांना तथा

प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या देय दिनांकापासून ते ३०/०४/२००६ पर्यंतची वेतनश्रेणीनूसार वेतन देणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | तत्कालीन शिक्षण सेवकाचे तथा प्राथमिक शिक्षकाचे नाव | प्रथम नेमणूक दिनांक | ३ वर्ष पूर्ण झाल्याचा तथा वेतन श्रेणी देय असलेला दिनांक | प्राथमिक शिक्षक पदाची नियमित वेतनश्रेणी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. तडवी हुसन नजीर | १५/०३/०२ | १४/०३/०५ | ०१/०५/०६ |
| २ | श्री.घायाळ रामदास आसाराम | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ३ | श्री.बर्डे भ्रत विष्णू | १५/०३/०२ | १४/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ४ | श्रीमती पवार ज्योतीबाला रामा | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ५ | श्री.कांबळे सुनिल काशिराम | ०८/०३/०२ | ०७/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ६ | श्री.सांळुंके भगवान मोतीराम | १४/०३/०२ | १३/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ७ | श्रीमती शेळके शैलजा संभाजी | ०९/०३/०२ | ०८/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ८ | श्री.ताठे तुषार संपत | ०८/०३/०२ | ०७/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ९ | श्रीमती पाटील अनिता शामराव | ११/०३/०२ | १०/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १० | श्रीमती किटे अनिता नामदेवराव | २३/०३/०२ | २२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ११ | श्रीमती श्रेष्ठ रिता गोपिनाथराव | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १२ | श्रीमती निकम मंगल देवराव | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १३ | श्रीमती वैष्णव हेमा राधेश्याम | ०९/०३/०२ | ०८/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १४ | श्री.अब्दुल अजीम अ.करीम | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १५ | श्री. शेख महंमद अलिम म. आजम | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १६ | श्रीमती मारावार अलका लक्ष्मीनारायण | ०९/०३/०२ | ०८/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १७ | श्रीमती शिंदे मंगल पुंडलिकराव | १३/०३/०२ | १४/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १८ | श्रीमती निमगांवकर विजया लक्ष्मी | ०७/०३/०२ | १३/०३/०५ | ०१/०५/०६ |
| १९ | श्री.घुले सुदर्शन शिवाजी | १३/०३/०२ | ०५/०४/०५ | ०१/०५/०६ |
| २० | श्रीमती तायडे आम्रपाली त्रिंबक | ०९/०३/०२ | १४/०६/०५ | ०१/०५/०६ |
| २१ | श्रीमती शिंदे वृषाली माकिराव | १४/०३/०२ | १८/०४/०५ | ०१/०५/०६ |
| २२ | श्रीमती पुरी आशा भिमराज | १४/०३/०२ | ०७/०४/०५ | ०१/०५/०६ |
| २३ | श्री.झुंजुरडे धनराज सिताराम | १८/०३/०२ | १७/०३/०५ | ०१/०५/०६ |
| २४ | श्री.उबाळे शशिकांत मोहन | १५/०३/०२ | १७/०३/०५ | ०१/०५/०६ |
| २५ | श्रीमती माळी रोहिणी रंगनाथ | ०८/०३/०२ | १९/०६/०५ | ०१/०५/०६ |
| २६ | श्री.राहणे केदार सोमीनाथ | ०८/०३/०२ | ०७/०३/०५ | ०१/०५/०६ |
| २७ | श्री.निवालकर गणेश भानुदास | ११/०३/०२ | १०/०३/०५ | ०१/०५/०६ |
| २८ | श्रीमती रशिदाउन्नीसा अब्दुल युसूफ | ११/०३/०२ | १०/०३/०५ | ०१/०५/०६ |
| २९ | श्रीमती कुर्ले विजया सुदाम | १३/०३/०२ | १२/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ३० | श्रीमती जाधव गायत्री रघुनाथ | १४/०३/०२ | २४/०३/०५ | ०१/०५/०६ |
| ३१ | श्रीमती धनवटे मंगला कांतीलाल | १४/०३/०२ | १३/०३/०५ | ०१/०५/०६ |

करीता उपरोक्त अनुक्रमांक १ ते ३१ वरील तत्कालीन शिक्षण सेवकांना तथा प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी देय दिनांकापासून ४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीनुसार दिनांक ३०/०४/२००६ पर्यंतच्या फरकाची रक्कम देण्याबाबतचा तसेच श्रीमती धनवटे मंगला कांतीलाल शिक्षण सेवक यांचे जातीचे प्रमाणपत्र वैध होऊन प्राप्त झाल्याने त्यांना त्यांच्या देय दिनांकापासून प्राथमिक शिक्षक या नियमित पदावर वेतनश्रेणी रूपये ४५००-१२५-७००० मध्ये नियुक्ती देण्याचा व त्याप्रमाणे वेतन अदा करण्याचा प्रस्ताव विचाराधीन सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल :अशा प्रकारचे शासनाचे आदेश असलेले १२-१२वर्षापासून काही डॉक्टर काम करतात शिक्षकांना लागू होतो तर डॉक्टरांना का नाही.

मा.आयुक्त : या ठरावानुसार हे स्पेशल शिक्षक सेवकासाठी आहे. डॉक्टराची पदे सभेच्या मान्यतेने शासनाकडे पाठविलेले आहे.

सौ.लता दलाल :आरोग्य अधिकारी पदे सुध्दा शासनाकडून मंजूर होवून आलेली आहे त्या पदावर जे कर्मचारी काम करीत आहे त्यांची नियमानूसार मुलाखती घेवून तात्पुरते नियुक्त केले होते त्यांना का कायम केले जात नाही.

मा.आयुक्त :आरोग्य अधिकारी यांना १२०००/- रू. वेतन करण्यात आले असून सदर पदाचा ठराव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्यासाठी शासनाचे स्पेशल आदेश लागतील शिक्षकांचा प्रॉपर जी आर आहे. ३ वर्ष शिक्षक सेवा नंतर शिक्षक म्हणून नियुक्ती होते.

श्री.प्रशांत देसरडा : ठरावात नमुद असलेल्या शिक्षकांनी आतापर्यंत केलेली सेवा चांगल्या प्रकारे केली आहे का याची तपासणी करावी.

श्री. अ.रशिद खान :शासनाचा पती-पत्नी एकत्रिकरण सेवा संदर्भात जी आर आहे. जालना येथील १ शिक्षक नियुक्त केले त्यांचे अगोदर १० लोकाचे प्रस्ताव आले होते त्यांना डावलून यांना घेतले हे योग्य नाही.सभागृहालाही माहित नाही.तसेच एक शिक्षक यांना एक महिण्यापूर्वी शिक्षा झाली पोलीस कोठडीत होते. पोलीसाकडून रिपोर्ट आले आजपर्यत काहीच कार्यवाही झालेली नाही.

श्री.संजय जोशी :मा.आयुक्ताकडे सदर संचिका जायला पाहिजे ती का थांबलेली आहे विधी विभागात फाईल आहे का,सदर शिक्षकास मुंबई येथील एका पोलीस स्टेशनमध्ये लॉकअपमध्ये ठेवले होते. ते जामिनवर सुटले आजही शिक्षक म्हणून काम करीत आहे. का कामावर ठेवले.

शिक्षणाधिकारी :समुह समन्वयक म्हणून श्री. बासीस्कर हे कार्यरत असून त्यांचे घरगुती भांडणावरून त्यांना वसई ठाणे पोलीस स्टेशनकडून एक रिपोर्ट आलेला होता. परंतू त्यांचेवर जी कार्यवाही करायची ती संबधीची माहिती स्पष्ट नसल्याने विधी सल्लागार यांचे सल्ल्याने वसई ठाणे पोलीस स्टेशनला २०-२-२००८ रोजी पत्र देवून माहिती विचारलेली आहे. संपूर्ण बोध झाल्यानंतर संबधीत शिक्षकावर कार्यवाही करण्यात येईल.तृटी पूर्ण न झ ााल्यामूळे संचिका मा.आयुक्ताकडे पाठविलेली नाही.

श्री.अ.रशिद खान :संचिका शिक्षणाधिकारी यांनी लपवून ठेवली मा.आयुक्ताच्या ही बाब निदर्शनास आणून द्यायला पाहिजे होती. जो व्यक्ती ४८ तासापेक्षा जास्त वेळ लॉकअप मध्ये राहत असेल तर तरच कार्यवाही होते. मा.आयुक्तांनी दुरध्वनीवरून पोलीस स्टेशनला माहिती विचारली असता ही बाब मा.आयुक्ताच्या निदर्शनास आणून द्यायला पाहिजे होती.

| | |
|---|---|
| शिक्षणाधिकारी | :विधी सल्लागार यांचे सल्ल्याने उपआयुक्ताकडे संचिका गेलेली आहे. |
| मा.आयुक्त | :कोणत्याही कारणामुळे कर्मचारी ४८ तास लॉकअप मध्ये असतील तर निलंबीत करता येते. सर्व कागदपत्र शिक्षणाधिकारी यांनी मागवून घ्यावे. |
| श्री.अ.रशिद खान | :जालना येथील एक शिक्षका घेतले त्यांचे पती माजी सैनिक आहे. त्या बाबतीत खुलासा द्यावा. |
| शिक्षणाधिकारी | :जालना जिल्हा परीषदेच्या एक शिक्षिका अंतर जिल्हा बदलीने या महापालिकेत रूजू झालेल्या आहेत. त्याचे पती माजी सैनिक असून पोलीस विभागात बाहेरील ठिकाणी काम करतात. |
| श्री.अ.रशिद खान | :या शिक्षिकेच्या अर्जापूर्वी १० लोकांनी आंतर जिल्हा बदली करावी म्हणून अर्ज दिले त्यांचे बाबतीत का कार्यवाही केली नाही. |
| श्री.संजय जोशी | :इतर ठिकाणचे शिक्षक या महापालिकेत मर्ज करायचे झाल्यास सर्वसाधारण सभेची मान्यता लागते. |
| शिक्षणाधिकारी | :सर्वसाधारण सभेचाच ठराव आहे. शिक्षण समितीकडून शिफारस होवून आलेला ठराव आहे. |
| श्री.महेश माळवतकर | :पत्नी पत्नी एकत्रीकरणाच्या संदर्भात शासनाचा जो जी आर आहे त्यानुसार यापूर्वी १० लोकांनी अर्ज केलेला आहे त्यांचे बाबतीतही विचार करावा. |
| शिक्षणाधिकारी | :जे प्रस्ताव आले ते अस्थापना विभागाकडे दिले होते. आता पुन्हा मागणी करून प्रस्ताव मागविलेले आहे सात प्रस्ताव आलेले असून शिक्षण समिती समोर लवकरच ठेवण्यात येईल. |
| श्री.अ.रशिद खान | : शिक्षकांचे आपसातील वाद यामूळे विद्यार्थ्याकडे दुर्लक्ष होते. शिक्षक घरी निघून जातात मुले मुलांना शिकवितात जसे एमसीएन मध्ये दाखवले. शिपाई यांचे भरवश्यावर शाळा सोडली जाते. ज्यांना घेणार त्यांनी चांगले काम करावे नसता निलंबनाची कार्यवाही होईल अशी ताकीद देवून कार्यवाही करावी जेणे करून मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. |
| श्री.संजय जोशी | : तीन शिक्षकांचे प्रमाणपत्र अवैध झाले त्यांचे बाबतील पुढे काय कार्यवाही केली. ६०-६२ लक्ष पगार त्यांना देण्यात आला ते वसूल करणार काय? |
| मा.आयुक्त | : त्यांचे जातीचे प्रमाणपत्र अवैध झाल्यामूळे त्यांना सेवेतून काढून टाकले त्यांना पगार दिला असला तरी त्यांनी काम केलेले आहे. जर त्यांनी चुकीची माहिती देवून किंवा भ्रष्टाचार करून प्रमाणपत्र घेतले असेल तर त्यांचेकडून वसूली करावी लागेल. बोगस होते की अवैध झाले हे बघावे लागेल. |
| श्री.संजय जोशी | :प्रमाणपत्र बोगस आहे म्हणूनच अवैध झाले. |
| मा.आयुक्त | :प्रमाणपत्र मिळत नाही म्हणून काहीतरी चुकीचे करून आणून दिले दुसरे असे की प्रमाणपत्र मिळाले पण स्क्रुटनीमध्ये अवैध झाले. चुकीच्या पध्दतीने मिळविले व सादर केले असेल तर दिलेला पगार वुसल करण्याचे कार्यवाही साठी ठेवावे. |

श्री.हिम्मतराव दाभाडे :श्रीमती मंगला धनवटे यांचे जातीचे प्रमाणपेत्र वैध झाले असे दिले ते कोणत्या जातीचे होते. व जागा कोणत्या संवर्गातील रिक्त होती.

शिक्षणाधिकारी :श्रीमती धनवटे मंगला यांचे जातीचे प्रमाणपत्र जात पडताळणी समितीकडे पाठविलेले होते. जेंव्हा प्रस्ताव ठेवला तेंव्हा यांचे प्रमाणपत्र वैध होवून आले नव्हते. त्यानंतर आले म्हणून क्र.३१ वर त्यांचे नाव समाविष्ट केले.

श्री.काशिनाथ कोकाटे :या शिक्षकांचा तीन वर्षाचा कालावधी २००५ मध्ये संपलेला आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे त्याची सेवा रेग्यूलर करण्यासंदर्भात प्रस्ताव दिला दोन वर्षापूर्वी प्रस्ताव येणे गरजेचे होते का दिला नाही. शासनाकडून पैसे येणार महापालिकेवर भार पडणार नाही याची कल्पना मला आहे.

मा.आयुक्त :सर्व प्रथम २००५ रोजी ठेवण्यात आला होता. विषय समिती मार्फत पाठवावा असा निर्णय दिला होता.

मा.महापौर :मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अनुक्रमांक १ ते ३१ वरील तत्कालीन शिक्षण सेवकांना तथा प्राथमिक शिक्षकांना वेतनश्रेणी देय दिनांकापासून ४५००-१२५-७००० या वेतनश्रेणीनुसार दिनांक ३०/०४/२००६ पर्यंतच्या फरकाची रक्कम देण्यास तसेच श्रीमती धनवटे मंगला कांतीलाल शिक्षण सेवक यांचे जातीचे प्रमाणपत्र वैध होऊन प्राप्त झाल्याने त्यांना त्यांच्या देय दिनांकापासून प्राथमिक शिक्षक या नियमित पदावर वेतनश्रेणी रूपये ४५००-१२५-७००० मध्ये नियुक्ती देण्यास व त्याप्रमाणे वेतन अदा करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, ऐतिहासिक हत्ती (खिजरी) दरवाजाची दुरूस्ती व जपवणूक करणे. या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/- चे सन २००६-०७ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प सन २००७-०८ मधील ऐतिहासिक वास्तु दुरूस्ती या लेखाशिर्षातर्गत करण्यात येणार आहे. सदरील अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी ऐतिहासिक हत्ती (खिजरी) दरवाज्याची दुरूस्ती व जपवणूक करणेच्या कामाचे रक्कम रू.२१,००,०००/- अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.हिम्मतराव दाभाडे :ऐतिहासिक हत्ती दरवाजे या शहरात किती आहे.

मा.आयुक्त :एकूण शहरात १५ दरवाजे असून १२ महापालिकेकडे असून त्यापैकी ५ दरवाजाचे कामकेले असून उर्वरीत दरवाजांचे कामासाठी शासनाकडून ग्रॅण्ड प्राप्त झाले आहे त्यातून काम होईल.जेझाले ते स्थायी समितीच्या मान्यतेने व काही आयुक्तांच्या मान्यतेने झालेले आहे हा एकच प्रस्ताव या सभागृहासमोर आहे टेंडरच्या नंतर किंमत वाढली तर येवू शकतो.मंजुरी द्यावी.

| | |
|---|---|
| श्री.संजय जोशी | : ज्या ऐतिहासीक वास्तू आहे त्या कमेटीवर अ.रशिद खान मामू होते. त्यांनाही हा दरवाजा माहिती नाही कुठे आहे. हा प्रस्ताव कुणी ठेवला. खुलासा द्यावा. |
| श्री.अ.रशिद खान | :इतर ही दरवाजे खराब झालेले आहे ते का घेतले नाही. |
| मा.आयुक्त | :१०० टक्के दरवाजे घेतले आहे. २० लक्षच्या वर खर्च होत आहे म्हणून या सभागृहासमोर ठेवला आहे. अति.शहर अभियंता यांनी हा प्रस्ताव ठेवलेला आहे. मा.महापौरांची परवानगीने ते आज हजर नाही. |
| श्री.देसरडा प्रशांत | :हा दरवाजा कुणी बांधला व कोणत्या काळात बांधला व ऐतिहासिक महत्व काय आहे. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ऐतिहासिक हत्ती (खिजरी) दरवाज्याची दुरूस्ती व जपवणूक करणेच्या कामाचे रक्कम रू.२१,००,०००/- अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७ :**

आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, महानगरपालिकेच्या कार्यभारात गती व अधिक सुसुत्रता आणण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत ERP Solution (Enterprize Resource Planning Base Solution) योजना अमलात आणण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक ११/८/२००६ ठराव/विषय क्र.२९२/११ नुसार मान्यता झालेली आहे. तसेच मा.स्थायी समिती सभा दिनांक २०/३/२००७ ठराव/विषय क्र.३०२ नुसार सदर योजना अमलात आणण्यासाठी M/s CMC Ltd. मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत सदरील योजना अमलात आणण्याचे काम प्रगती पथावर आहे. ही योजना पूर्णपणे कार्यान्वीत करण्यासाठी संगणकीय साहित्य खरेदी करण्यास मा.स्थायी समिती सभा दिनांक ०५/०२/२००८ च्या विषय क्र.३२८ नुसार मान्यता झालेली आहे. संगणकीय साहित्य मांडणीसाठी अद्यावत Data Center उभारणे अत्यावश्यक आहे.

मालमत्ता विभाग इतरत्र स्थलांतरीत करून त्या ठिकाणी अद्यावत Data Center उभारणे त्या लगतच असणारे ई-निविदा विभाग व नगर रचना विभागाचा Auto DCR कक्ष यांचेही आधुनिकीकरण करून एकत्रित E-Floor तयार करण्यासाठी ERP योजना कार्यान्वीत करण्यासाठी नेमण्यात आलेली यंत्रणा M/s CMC Ltd.यांचे Consultant VENUSTUS Architect & Interior Designer Pune यांचे कडून संकल्पना चित्र व अंदाजपत्रक तयार करून घेण्यात आले आहे व या अंदाजपत्रकानुसार E-Floor साठी रूपये ३६,६३,०८५/- खर्च अपेक्षीत आहे.याकामासाठी प्राप्त होणाऱ्या निविदादराच्या २% दराने प्रकल्प सल्लागार म्हणून काम करण्यास संबंधीत वास्तुविशारद यांनी तयारी दर्शविली आहे. सन २००७-०८ च्या प्राप्त शासकीय अनुदानातून आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

तरी VENUSTUS Architect & Interior Designer Pune यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करण्याच्या मान्यतेसह E-Floor साठी रूपये ३६,६३,०८५/- च्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.प्रशांत देसरडा | : पीएमसी निश्चित करण्याचे अनेक ठराव यापुर्वी रस्त्याचे कामाचे मंजूर केलेले सध्या गजानन महाराज मंदीर समोरील रस्त्याचे काम चालू असून दुभाजकामध्ये चुनखडीची माती टाकली जात |

आहे.बरोबर नाही. शहानुरवाडी रस्त्याच्या खाली सलग लांबवर ड्रेनेज लाईन असतांना.पीएमसीने कोणतीही माहिती दिली नाही. ड्रेनेज लाईन चोकअप झाली तर पुर्ण रस्ता खोदावा लागेल.शिवाजी हायस्कूल समोरीलही रस्ता बरोबर केलेला नाही.असे असेल तर पीएमसी कशासाठी व त्यांचे काम काय असते. जेंव्हा डांबरीकरणाची कामे चालू असतांना आम्ही सदर ठिकाणी जातो तेंव्हा पीएमसीचे कुणी दिसून येत नाही. तीन चार कोटी पीएमसीला गेले. ठेकेदाराकडून पीएमसी विकले जातात.

श्री.संजय जोशी :जी संस्था महापालिकेला ईआरपी यंत्रना देणार आहे त्यांचे नाव सीएमसी लिमीटेड असे आहे. त्यांचेच कन्सल्टंटला पीएमसी म्हणून का नेमायचे, ईआरपी साठी ३ कोटी म्हणजे दोन कोटीचे सॉप्टवेअर एक कोटीचे हार्डवेअर घेतले. ई-टेंडरींग केले ॲटोडीसीआर तयार होईल डीजाईन करण्यासाठी पीएमसी म्हणजे काय खुलासा द्यावा. ईआरपीला जेंव्हा देणार त्याचे वायरींग सॉप्टवेअर घेणे हे काम ईआरपी यांचेच असणार आहे ई.आर.पी. देवू इन्टाल करणे कोणाचे काम आहे. ईटेंडरींग जेथे होते त्या चौकोणी खोलीला पीएमसी नेमण्याची गरज काय १० खोल्या बाधंता येईल वायरींग ईआरपीवाले करतील डिझाईन ईआरपी करेल इन्साटलींग सह आहे. आता येथे पीएमसी नेमण्याची गरज नाही.

मा.आयुक्त :पीएमसी शिवाय अशी मोठी कामे होवू शकत नाही. शहरात जे २५ कोटीचे मोठे रस्ते झाले ते झाले नसते. गुणवत्ता पडताळणी आवश्यक आहे.

श्री.संजय जोशी : रस्त्याचा सर्वे,जमिनीचा डाटा तसेच क्वॉलीटी तपासणी व ते मेन्टन होते की नाही हे बघण्याचे काम पीएमसीचे असते.ते करीत नाही. पीएमसीचे काम काय असते.

मा.आयुक्त :१०० टक्के काम पीएमसीचेच असते त्यात डिझाईनपासून ते क्वॉलीटी तपासणी व काम अंतिम होईपर्यत काम असते.

श्री.संजय जोशी :रस्त्याच्या खालून ड्रेनेज लाईन जाते ती काढली जात नाही हे सांगण्याचे काम पीएमसीचे असतांना का काढले नाही. रस्ता तयार केला.

मा.आयुक्त : या बाबतीत चौकशी करण्यासंदर्भात संबधीत अधिकारी यांना सुचना करण्यात येईल. रस्ता होण्या अगोदर जे ही स्थलांतर करायचे आहे ते करणार आहोत. पुन्हा रस्ता खोदण्याची गरज पडणार नाही. त्यासाठी लागणारा खर्च व त्याची लाईन किती त्या प्रमाणे ती स्थलांतरीत करणे योग्य आहे की नाही या बाबत निर्णय घ्यावा लागतो. त्या प्रमाणे या रस्त्याच्या ड्रेनेज लाईनचा निर्णय झालेला आहे.

श्री.संजय जोशी :शहानुरमिया दर्गा ते सुतगिरणी रस्त्यावर यावे ज्या ड्रेनेज लाईनची लाईफ संपलेली नाही ती स्थलांतर केली उद्या वेळ ठरवा सत्य परीस्थिती दिसून येईल.

मा.आयुक्त : येत्या २३ तारखेला दुपारी १२वाजता भेट देवू.

श्री.संजय जोशी :कोणत्या वेळी जायचे हे अधिकार महापौरांचे असतात ते वेळ निश्चित करतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एजन्सी ५% घेत असेल, टाटा इन्स्टीटयुट ला का देत नाही. टाटा कन्सल्टन्सीला पीएमसीचे काम द्यावे यांची टक्केवारी कमी असेल. लातूर मध्ये काम केलेले आहे. वेगवेगळया एजन्सीला ऑफर द्या ते करून देतिल टाटाला द्या प्रॅाब्लेम राहणार नाही. स्पेशीफिकेशन मध्ये फरक पडणार नाही.

मा.आयुक्त :रस्त्याचे कामासाठी एमएसआरडीच्या पॅनलवरील कन्सल्टन्सी घेतलेले आहे. यात त्यानी पुर्ण सॉप्टवेअर आणून करणार आहे तसेच महापालिके करीता हार्डवेअरसाठी पीएमसी म्हणून काऊंट करणार बाकीचे हार्डवेअर जे विकत घेणार आहे जर आपल्या निदर्शनाखाली विकत घेतले तर हार्डवेअर चुकीचे होते म्हणून सॉप्टवेअर चालले नाही असे होवू नये. त्यांनी हार्डवेअर विकत घेण्याचे ऑर्डर दिले. हार्डवेअर चालविण्यासाठी डाटा संकलित करावे लागेल. तीन मोठे सिस्टम महापालिकने कॉम्प्युटराईज केलेले आहे. तीन कोटीचे ईआरपी घेत आहोत. यात इंटरनेटपासून कंम्प्युटर पर्यंत सर्व राहणार ३६ लाखाचे डिझाईन कॅपॅबीलीटी आपणाकडे नाही. आतील पुर्णपणे जे वायर जागणार, त्यात इन्टरनेट ॲटोडीसीआर पासून सर्व कॉम्प्यूटरचे तेथे कनेक्शन तेथे कनेक्ट राहणार ३५-३६ लक्ष खर्च येत आहे त्यातील ५० टक्के शासनाकडून घेत आहे. ३६ लक्षचे डिझाईन करण्याची कॅपॅबीलीटी महापालिकेकडे नाही. यात ई फ्लोअर मध्ये जे इन्टरनल डिझाईन करायचे आहे ३५ लक्षचे दोन टक्केने ८० हजार होते. यात जे तज्ञ लोक आहे ज्यांना इन्टरनल डाटा सरवर रूमची वायरीग कशी करायची कुठे ठेवायचो एसी कुठे ठेवायचे किती साईजचा ठेवायचे याची माहिती महापालिकेकडे नाही ते करणे शक्यही नाही. महापालिकेने करायचे झाल्यास एक व्यक्तीला कायमचे घ्यावे लागेल कायमचा त्यांचा खर्च राहील त्याऐवजी दोन टक्के देणे परवडेल. नसता तीन कोटीचे काम बरोबर होणार नाही.

श्री.कटकटे सतीश :पीएमसीचे काम काय असणार काम सुरू झाल्यापासून संपेपर्यत पीएमसीचे कर्मचारी असावयास पाहिजे.

मा.आयुक्त :डिझाईनपासून ते सुपरविजन पर्यत असेल. पीएमसीचे कर्मचारी तेथे असावयास पाहिजे आतापर्यत सॅम्पल टेस्टींग करीत होतो. पीएमसीकडून सॅम्पलचे १०० टक्के टेस्टींग करून घेतो २४ तास महापालिकेला त्या जागेवर सुपरविजन करणे शक्य नाही.

श्री.सतीश कटकटे :पीएमसीचे कोणीही साईटवर दिसून येत नाही दर महिण्याला एका कामाचे लोक बदलतात हे योग्य नाही काम बरोबर होत नाही.

मा.आयुक्त :व्यक्ती बदलला म्हणून हरकत नसावी पीएमसी तीच असते. त्यांचे सुपरव्हिजन चांगले असते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: २ टक्के प्रमाणे जर कुणी काम होईपर्यत सुपरविजन करीत असेल तर त्यांना देण्यास हरकत नसावी व्यक्ती बदलला तर फरक

पडत नाही दुसरे आले तरी त्याच पीएमसीचे असतात. आपणाकडे या कामाची क्षमता नाही ते हमी देत आहेत. नेहमी येऊन पाहतील.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : बाकीच्या कन्सल्टन्सी असतील त्यांना इतर दुसरी कामे घ्यावी.

श्री.संजय जोशी :ॲटो डीसीआर तयार केल्यानंतर त्याची इंस्टॉल कोण करणार आहे.

मा.आयुक्त :ॲटो डीसीआर बीओटीवर केलेले आहे.

श्री.संजय जोशी :३ कोटीचे ईआरपीचे साहित्य सॉप्टवेअर हार्डवेअर घेतले. इंस्टॉल कोण करणार आहे.

मा.आयुक्त :ॲटो डीसीआर व याचा काही संबध नाही. ॲटो डीसीआर स्वतंत्र चालू आहे. ईटेंडरीग बीओटीवर स्वतंत्र चालू आहे.

श्री.संजय जोशी : ईटेंडरींग बीओटीवर आहे तर त्यासाठी पीएमसी नेमण्याची गरज काय?

मा.आयुक्त : हे ईटेंडरीगसाठी नाही. ईआरपीसाठी आहे.

श्री.संजय जोशी : एकाच ठिकाणी असेल म्हणून ३६ लक्ष खर्च करायचे आहे असे दिले.

मा.आयुक्त : ईटेडरींग बीओटीवर चालू आहे त्यांचे कॉम्प्युटर आहे. ॲटो डीसीआर आहे ते त्यांचेच आहे. ईआरपी करीत आहे ते बीओटीवर होवू शकत नाही. आपले इन्टरनल कॉम्प्युटरायजेशन आहे जेव्हा त्यासाठी एवढा मोठा खर्च करणार पुर्ण फ्लोअर आहे त्यास ई-फ्लोअर करू या. आणि १०० टक्के कॉम्प्युटरायजेशन करीत आहे.

श्री.संजय जोशी :ई-फ्लोअर यासाठी असणार बीओटीवर झालेल्यांना सर्व सुविधा पीएमसी नियुक्त करून देणार आहे.

मा.आयुक्त :सुविधा म्हणजे त्यांना फक्त जागा व टेंबल खुर्ची टाकण्यासाठी

श्री.संजय जोशी :टेबल खुर्ची पुरती जागा देण्यासाठी पीएमसीची गरज नाही.

मा.आयुक्त :डिझाईनमध्ये इन्टरनल फ्लोरींगच्या खाली वायरींग असेल ३५ लक्षचे २ टक्केने ७० हजार होतात फक्त एवढेच पीएमसीला द्यावे लागणार आहे.

श्री.संजय जोशी : फ्लोरींगच्या खाली वायरींग आपण टाकू शकणार नाही इथपर्यंत बरोबर आहे. खर्च कमी जास्त लागेल तो भाग नाही १ लक्षचे शहानुरमिया दर्गा रस्त्यावर पॅचवर्कचे काम करू शकले नाही अनेक दिवसापासून मागणी करतो आहे.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :सुतगिरणी ते शिवाजीनगर रस्त्याचे काम चालू आहे पीएमसीचे कुणीही लोक महापालिकेचे कर्मचारी नसतात.

श्री.प्रशांत देसरडा : एक दिवसही साईटवर राहात नाही.

मा.आयुक्त :पीएमसीचे लोक काम चालू असतांना जागेवर राहून काम करीत नसतील तर त्यावर आपले अधिकारी कन्ट्रोल करतील व समजावून सांगतिल.

श्री.संजय जोशी :प्रत्येक येणाऱ्या डांबराच्या गाडीचे टेंप्रेचर वेगवेगळे असते. ते पीएमसीच्या लोकांनी तपासणी केली पाहिजे पीएमसीचे कोणीही नसतात ते तपासणी करण्यासाठी महापालिकेचे जेई किंवा रोड कारकून असतात. चार वेळेस पीएमसीच्या व्यक्तीला फोन केला आले नाही. कशासाठी पीएमसी पाहिजे.

श्री.संजय सिरसाट :पीएमसीच्या या स्थायी समितीचा प्रस्ताव होता. या संदर्भात मा.आयुक्तांची भुमिका चांगली आहे माझ्या वार्डात एक सिमेन्टचा रस्ता घ्यावा म्हणून सुचविले त्यास जास्त खर्च येतो म्हणून डिफ पेमेन्टवर एक कोटीचा रस्ता घेतला. काम करण्याची मशीनरी आली तीन उदघाटन झाले तीन महिण्यात काम पूर्ण करणार आहोत श्री.काझी उप अभियंता यांनी जाहीर केले. त्या रस्त्यात श्री.तळेकर यांची जागा येत होती ती खाली केली वेदात हॉटेलची भिंत येत होती. ती काढली एक वर्ष झाले रस्ता झाला नाही. पीएमसी ठेकेदार व श्री.काझी यांचे आपआपसात साईडवर भांडण अशी परीस्थिती आहे. एजन्सी पीएमसीला २ टक्के देते फायदा करून घेतात श्री.काझी नावाचे कार्यक्षम अभियंता आहेत त्यांचे म्हणणे आहे कामाचे ड्राईंग प्रमाणे काम व्हावें काझी इमानदार अभियंता त्यांना डिफर पेमेंट कळाले नसावे. एक साईडचा रस्ता पुर्ण झाला परवा दुसऱ्या साईडचा रस्ता सुरू केला आहे. पीएमसीकडे १०-१५ हजार पगारावर काम करतात. वेदांत नगर येथे २ ड्रेनेज लाईन जातात ते स्थलांतर केले नाही. कुणीही अधिकारी तेथे नसतो. पुर्वी रस्त्याचे काम चालू असे दुय्यम अवेक्षक व जेई हे साईटवर असायचे आज अधिकारी यांना विचारणा केली तर माहित नाही श्री.काझी यांना हटविले माझे वार्डातील रस्त्याचे काम थांबले पीएमसीच्या एजन्सीज आहे त्यांना पोसण्याचे काम करतो असे माझे मत आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून काम करून घ्यावे पीएमसी पध्दत बंद करावी.

मा.आयुक्त : आपणाकडे २ पध्दतीने कामे होतात महापालिकेचे अधिकारी नेमून काम करावे किंवा पीएमसीला कामाचे स्वरूप बघून जे दोन ते अडीच टक्के प्रमाणे काम देवून त्यांचे इंजिनिअर कडून काम करून घेणे असे दोन पध्दतीने काम करता येते. कोणती काम करतांना त्यावर सरासरी १७ टक्के खर्च हा अस्थापनेवर होतो. पगार मधून खर्च होतो तो दिसून येत नाही. परंतू पीएमसी नेमून जो काही खर्च होतो तेवढाच आपले कर्मचारी लावून होतो. पूर्ण एमएसआरडीसी १०० टक्के पीएमसी नेमून काम करते. प्रत्येक कामासाठी महापालिकेचे कर्मचारी देणे शक्य होणार नाही. ऑलरेडी ३० टक्के पेक्षा जास्त खर्च अस्थापनेवर होत आहे. म्हणून पीएमसी नेमण्याशिवाय काम करणे शक्य नाही पीएमसीने सुध्दा कन्ट्रोल मध्ये काम करायला पाहिजे. जर एखादे काम चांगले झाले नाही असे वाटत असेल तर दुसऱ्याकडून तपासणी करून घेवू एमआरडीसीची रेग्यूलर पीएमसी आहे ते खराब काम करणार नाही तसे झाल्यास त्याची कामे बंद होतील.

श्री.संजय सिरसाट :पीएमसीची गरज नाही९० अभियंते आहे. महिण्याला एक अभियंता यांनी २० अंदाजपत्रक तयार केले तर १० हजार अंदाजपत्रक तयार करू शकतात.

मा.आयुक्त :अंदाजपत्रक केले म्हणजे पूर्ण काम होते असे नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:ही बैठक तहकूब करावी निवडणुकीच्या सभेची वेळ निघून गेली आहे. ती सभा अगोदर घ्यावी नंतर ही सभा पुन्हा सुरू करावी.

श्री.संजय सिरसाट :सभा तहकूब करून निवडणूकीची बैठक घेण्यात यावी.

मा.महापौर : ज्या ज्या कामासाठी पीएमसी नियुक्त केली आहे सर्व पीएमसी व्यवस्थीत काम करीत आहे की नाही याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. अनेक ठिकाणी चुकीची कामे होत असे असे मत सदस्यांनी मांडले त्या सर्व ठिकाणी सर्व पदाधिकारी यांचे समवेत २५ तारखेला भेट देणार आहोत. हा विषय मंजूर करण्यात येतो. स्थायी समितीच्या आठ सदस्य निवडी बाबत सभा आयोजित केलेली आहे ती सभा आता होईल त्यानंतर लगेच ही सभा घेतली जाईल तोपर्यंत ही सभा तहकुब करण्यात येते. (वेळ दु.३-५५ वा. पुन्हा सभा ४-४५ वा.सुरू)

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या कार्यभारात गती व अधिक सुसुत्रता आणण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेत ERP Solution (Enterprize Resource Planning Base Solution) योजना अमलात आणण्यासाठी मालमत्ता विभाग इतरत्र स्थलांतरीत करून त्या ठिकाणी अद्यावत Data Center उभारणे त्या लगतच असणारे ई-निविदा विभाग व नगर रचना विभागाचा Auto DCR कक्ष यांचेही आधुनिकीकरण करून एकत्रित E-Floor तयार करण्यासाठी ERP योजना कार्यान्वीत करण्यासाठी नेमण्यात आलेली यंत्रणा M/s CMC Ltd.यांचे Consultant VENUSTUS Architect & Interior Designer Pune यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करणेस तसेच E-Floor साठीच्या र.रू.३६,६३,०८५/- अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच ज्या ज्या कामासाठी पीएमसी नियुक्त केली आहे सर्व पीएमसी व्यवस्थीत काम करीत आहे की नाही याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. अनेक ठिकाणी चुकीची कामे होत असे, असे मत सदस्यांनी मांडले त्या सर्व ठिकाणी सर्व पदाधिकारी यांचे समवेत २५ तारखेला भेट देतील. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १६८ :</u>**

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील सन २००६-०७ वर्षासाठी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद या संस्थेने तयार केलेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७-(अ) नुसार पर्यावरण अहवाल मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

करीता पर्यावरण अहवाल २००६-०७ मा.सर्वसाधारण सभेसमोर अवलोकनार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.प्रशांत देसरडा :यावर अभ्यास करायचा आहे पूढील बैठकीत घेण्यात यावा.

मा.महापौर :पुढील बैठकीत माहितीसह ठेवण्यात यावे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव पुढील बैठकीत माहितीसह ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**<u>विषय क्र. १६९ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पामध्ये कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या विभागासाठी भांडवली कामे या लेखाशिर्षात नविन कामासाठी रू.३९९.१० लक्ष तसेच देखभाल व दुरूस्तीच्या नविन कामासाठी रक्कम रू.४२३.२४ लक्ष एवढी तरतुद ठेवण्यात आली होती. त्यापैकी जानेवारी २००८अखेर भांडवली कामातून रू.३७१.४१ लक्ष व देखभाल दुरूस्तीच्या लेखाशिर्षातून रक्कम रू.३६०.८० लक्ष इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकांच्या नोंदी घेण्यात आल्यात.

आगामी दोन महिण्यासाठी देखभाल व दुरूस्तींच्या कामासाठी या विभागास तरतुदीची गरज भासणार आहे.

करीता भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षात शिल्लक असलेली तरतुद रक्कम रू.२७.६९ लक्ष ही रक्कम देखभाल व दुरूस्तींच्या नविन कामासाठी वळती करण्यात यावी. तसेच सदरची वळती करण्यात आलेली तरतुद व देखभाल व दुरूस्ती लेखाशिर्षात शिल्लक असलेली तरतुद रक्कम रू.६२.४४ लक्ष अशी एकुण रू.९०.१३ लक्ष अशा तरतुदी मधुन कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या अधिपत्त्याखालील सर्व उप विभागांसाठी ती वापर करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षात शिल्लक असलेली तरतुद रक्कम रू.२७.६९ लक्ष ही रक्कम देखभाल व दुरूस्तींच्या नविन कामासाठी वळती करण्यास तसेच सदरची वळती करण्यात आलेली तरतुद व देखभाल व दुरूस्ती लेखाशिर्षात शिल्लक असलेली तरतुद रक्कम रू.६२.४४ लक्ष अशी एकुण रू.९०.१३ लक्ष अशा तरतुदी मधुन कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांच्या अधिपत्त्याखालील सर्व उप विभागांसाठी ती वापर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १७० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.९४ बन्सीलाल नगर येथे क्रिडा संकुल विकसीत करणे करीता सा.बा.विभागाचे जिल्हा दरसुची सन २००६-०७ नुसार रक्कम रू.२४,९९,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरील कामाचा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षाअंतर्गत विकास इमारती शाळा दवाखाने या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२४,९९,६००/- चा प्रस्ताव मान्यतेच्या विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९४ बन्सीलालनगर येथे क्रिडा संकुल विकसीत करणे करीता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.२४,९९,६००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १७१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोबाईल टॉवर उभारण्यासाठी दिनांक ०१.०४.२००६ पर्यंत ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येत होते. परंतू शासन निर्णयाप्रमाणे त्यानंतर बांधकाम परवानगी देणे आवश्यक असल्याने, बांधकाम परवानगी देतेवेळी खालीलप्रमाणे शुल्काची आकारणी करण्यात यावी.

| अ.क्र. | शुल्का आकारणी | रक्कम रूपये | | वि.नि.नि.नुसार नियम क्र. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | बांधकाम परवानगी फी | १ | २००/- ते २६०/- | ६.५.१.४ | |
| | | २ | २०,०००/- प्रत्येक प्रकरणासाठी | | |
| ०२. | कॅपीटेशन फी | | २५,०००/- | ६.५.६. | |
| ०३. | अनामत रक्कम Non refundable | १ | ५०,०००/- ना परतावा | शासन परिपत्रक दि.४.७.०५ नुसार | |
| | Refundable | २ | १०,०००/- | ६.२.११ | |
| ०४. | प्रिमियम | | मोबाईल टॉवर कॅबीनसाठी शिघ्र सिध्द गणका नुसार जागेच्या भावा प्रमाणे. | | |
| ०५. | मोबाईल टॉवरच्या उंचीसाठी प्रिमियम | | १०,०००/- प्रती मीटरसाठी | शासन परिपत्रक दि.०४.०७.०५ नुसार | मा.न्यायालयाने अवैध ठरविलेले आहे. |

मोबाईल टॉवर उभारणीसाठी व्यावसायीकरित्या बांधकाम परवानगी देतेवेळी खालीलप्रमाणे धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

०१. व्यावसायीक वापरासाठी मिळकती लगत खालीलप्रमाणे रस्त्याची रूंदी आवश्यक आहे.

**अ.** आर - १ साठी - ९.०० मीटर रूंद रस्ता

**ब.** आर - २ साठी - १२.०० मीटर रूंद रस्ता

०२. मोबाईल टॉवर उभारणीसाठी बांधकाम परवानगी प्रस्ताव ज्या मिळकतीवर दाखल करण्यात येतो त्या मिळकत धारकाने संबंधीत इमारतीचे संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

०३. घोषित झोपडपट्टी व गुंठेवारीमध्ये नियमित केलेल्या जागेवर/मालमत्तेवर रितसर परवानगी देणे.

मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.देसरडा प्रशांत :शहरात सन २००० पासून मोबाईल टावर्स चालू आहे. माझे माहिती प्रमाणे आज रोजी ३०० टावर्स उभे असून दर अद्याप निश्चित झालेले नाही. यामूळे महापालिकेचे करोडोचे नुकसान झाले यास जबाबदार कोण तसेच अनधिकृत टावर्स मुळे धोका निर्माण होवू शकतो यास ही कोण जबाबदार आहे. आता दर निश्चित केले जर २००३ पासून टावर्स असतील तर तेंव्हापासूनचे दर आकारून वसूली करणार काय याचाही खुलासा करावा. तसेच शहरात किती टावर्स आहेत किती धोकादायक आहेत याचाही खुलासा व्हावा.

श्री.गजानन बारवाल :धोकादायक टावर्स उभे असतील तर बाजूला निवासी असलेल्या नागरीकांचा विचार केला पाहिजे. अटी शर्तीचे पालन व्हावे. जेथे कमी जागा असेल व टावर्स उभे केले करतांना बाजूच्या लोकांची एनओसी असणे गरजेचे आहे. सोसायटीच्या जागेवर सोसायटीची परवानगी घ्यावी. नागरीकांचे विचार घ्यावे.

श्री.संजय जोशी : अपार्टमेंटला विकासक परवानगी घेतो. निवासी परवानगी असते. सदनिकेत सामान्य नागरीक राहतात त्याचा विचार व्हावा. अग्नीशमन दलाचे नाहरकत प्रमाण पत्राचा उल्लेख नाही. जनरेटर असते. केव्हाही आग लागु शकते टावर कधीही पडू शकते.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: अटी टाकूण परवानगी द्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :नियमाप्रमाणे टावर्स उभे असावे त्याप्रमाणे कार्यवाही करावी महापालिकेचा महसूल वाढेल. आपण नियम करू तेच अंतीम नियम राहतील.

श्रीमती कला बोरामणीकर:माझे वार्डात मोबाईल टावर्स जास्त आहे. नियमीत करावे धोकादायक असेल तर त्या प्रमाणे कार्यवाही व्हावी.

मा.महापौर :शहरात किती टावर्स आहेत अनधिकृत किती लिगल किती खुलासा करावा.

उप अभियंता (न.र.) :शहरात एकूण १६० टावर्स असून फक्त ६० टावर्सला एनओसी दिलेली आहे.

श्री.प्रशांत देसरडा :सर्व टावर्स रेग्यूलाईज करून घ्यावे मा.महापौर यांनी पाठपूरावा करून हा ठराव आणलेला आहे. १०० टावर्स आजही अनधिकृत आहे. सर्व रेग्यूलाईज करावे नाही केले तर पाडण्याची कार्यवाही करावी व वर्षवाईज दंडात्मक कार्यवाही करावी.

मा.आयुक्त : जे अनधिकृत आहे व ते ज्या इमारतीवर आहे त्या इमारत मालकांनी भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले आहे की नाही याची चौकशी करून जे अनधिकृत रित्या उभे केले आहे त्यांना नोटीस देवून रेग्यूलाईज करण्या संदर्भात नियुमाने कार्यवाही केली जाईल.

श्री.सतिष कटकटे : बांधकाम परवानगी न घेता टावर्स उभे आहेत. नगर सेवकांनी या संबंधात पत्र दिले त्यावर काय कार्यवाही झाली.

श्री.त्र्यंबक तुपे :१६० पेक्षा जास्त टावर्स आहेत पुन्हा सर्वे करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : रेग्युलर करून घ्यावे महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

श्री.देसरडा प्रशांत : इमारतीची परवानगी असावी. ज्याची नसेल त्यानी घ्यावी. जेवढे टावर्स आहे त्यास रेग्यूलर करावे.

मा.आयुक्त :सर्वे करण्यात येईल इमारतींना एम.आर.एस.टी.पी. ॲक्ट खाली नोटीस देवू तोपर्यंत त्यांनी नियमित करून घ्यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :ज्या त्या वार्ड कार्यालया अंतर्गत असलेल्या टावर्सचा सर्वे करण्याची जबाबदारी वार्ड अधिकारी यांना द्यावी.

मा.महापौर :विषय मंजूर करण्यात येतो. शहरात असलेल्या संपूर्ण टावर्सचा प्रशासनाने सर्वे करावा. अनधिकृत टावर्स असतील तर त्यांना नोटीस देवून रेग्यूलाईज करण्याची कार्यवाही करावी दंडाची आकारणी करण्यात यावी. प्रत्येक टावर्ससाठी अपार्टमेंट सोसायटी अग्निशमन विभागाची एनओसी घेण्याचे सक्तीचे करावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोबाईल टॉवर उभारण्यासाठी शासन निर्णयाप्रमाणे बांधकाम परवानगी देतेवेळी प्रस्तुत प्रस्तावातील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे शुल्काची आकारणी करणेस व मोबाईल टॉवर उभारणीसाठी व्यावसायीकरित्या बांधकाम परवानगी देतेवेळी खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येते.

०१. व्यावसायीक वापरासाठी मिळकती लगत खालीलप्रमाणे रस्त्याची रूंदी आवश्यक आहे.

**अ.** आर - १ साठी - ९.०० मीटर रूंद रस्ता

**ब.** आर - २ साठी - १२.०० मीटर रूंद रस्ता

०२. मोबाईल टॉवर उभारणीसाठी बांधकाम परवानगी प्रस्ताव ज्या मिळकतीवर दाखल करण्यात येतो त्या मिळकत धारकाने संबंधीत इमारतीचे संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.
०३. घोषित झोपडपट्टी व गुंठेवारीमध्ये नियमित केलेल्या जागेवर/मालमत्तेवर रितसर परवानगी देणे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे, शहरात असलेल्या संपूर्ण टावर्सचा प्रशासनाने सर्वे करावा. अनधिकृत टावर्स असतील तर त्यांना नोटीस देवून रेग्यूलाईज करण्याची कार्यवाही करावी दंडाची आकारणी करण्यात यावी. प्रत्येक टावर्ससाठी अपार्टमेंट सोसायटी अग्निशमन विभागाची एनओसी घेण्याचे सक्तीचे करावे. यासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८३ पुंडलिक नगर येथील एन एस ४ सिडको येथील न्यु हनुमान चौक ४० फुट रोडवर हनुमान मंदीर सेवाभावी मंडळ न्यु हनुमान नगर यांच्या वतीने चौकात लोखंडी कमान बसविणार आहेत कमानीचा खर्च स्वत: सेवाभावी मंडळ करणार आहे. तरी त्यांना महानगरपालिकेच्या वतीने नाहरकत प्रमाणपत्रासाठी व परवानगीसाठी सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा ही विनंती.

सुचक :सौ.संगिता विठ्ठलराव जाधव अनुमोदक :सौ.वंदना प्रकाश खंदारे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८३ पुंडलिकनगर येथील एन एस ४ सिडको येथील न्यु हनुमान चौक ४० फुट रोडवर हनुमान मंदीर सेवाभावी मंडळ न्यु हनुमान नगर यांच्या वतीने चौकात लोखंडी कमान बसविणार असल्यामूळे त्यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळयाचा ठराव सर्वसाधारण सभेत पारीत झाला असुन तो पुतळा इतरत्र न बसविता गजानन महाराज मंदिर समोरील पुंडलिकनगर कडे जाणाऱ्या चौकात बसविण्यात यावा. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे

अनुमोदक : सौ.शोभाताई हरिश्चंद्र मिटकर, सौ.रेखा कैलास काथार,
श्री.संतोष जेजुरकर, श्री.भाऊसाहेब वाघ

**संवाद :**

श्री.विजय खुडे :प्रस्तावातील नमुद केलेला चौक माझ्या वार्डात आहे मला विचारणा करण्यात आली नाही.

मा.महापौर : या प्रस्तावात सुचक म्हणून स.सदस्य श्री.विजय खुडे यांचे नावाचा समावेश करावा हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

श्री.प्रशांत देसरडा :चौकातील होर्डींग अगोदर काढाव्यात जेणे करून थोर पुरूषांचे पुतळे बसविणे सफल होईल. यासाठी एक स्वतंत्र नियमावली तयार करावी.

श्री.अ.रशिद खान : मिलकॉर्नर येथील शाहू महाराज यांचा पुतळा पुर्ण होर्डीगने झ ाकलेला आहे वारंवार सुचना करूनही चौकातील होर्डीग काढले जात नाही. याचे कारण काय?

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी याची दखल घ्यावी व चौकातील सर्व पुतळे व्यवस्थीत कशी राहतील याची काळजी घ्यावी या प्रस्तावास मंजूरी देण्यात येते.

श्री.देसरडा प्रशांत :महापालिकेने ठरवून दिलेल्या जागेवर होर्डीग लागल्या पाहिजे.

श्री.अ.रशिद खान :होर्डीगची रक्कम भरणा करून घेतली जाते तेंव्हा जागा निश्चित करून दिली पाहिजे. तसे होत नाही. त्यामूळे ही परीस्थिती निर्माण होते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा पुतळा इतरत्र न बसविता गजानन महाराज मंदिर समोरील पुंडलिकनगरकडे जाणाऱ्या चौकात बसविण्यास तसेच सदर प्रस्तावास सुचक म्हणून स.स.श्री.विजय किसनराव खुडे यांचे नांवाचा समावेश करण्याच्या दुरुस्तीसह सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८२ पारिजातनगर येथील खुल्या जागेवर उद्यान विकसीत होत आहे सदर उद्यानास संत शिरोमणी सावता महाराज यांचे नांव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे

अनुमोदक : सौ.शोभाताई मिटकर,सौ.रेखा कैलास काथार,श्री.संतोष जेजुरकर,श्री.भाऊसाहेब वाघ

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८२ पारिजातनगर येथील खुल्या जागेवर उद्यान विकसीत होत असलेल्या उद्यानास संत शिरोमणी सावता महाराज यांचे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विषय क्र.२६ मध्ये वार्ड क्र.९० एकनाथ नगर अंतर्गत चिंतामणी कॉलनी येथील म.न.पा. विहीरीत पाण्यामध्ये बुडून मरण पावलेला मुलगा गौतम बिऱ्हारे फुले नगर येथील रहिवाशी असून त्याचा दुर्देवी मृत्यू ता.१२.८.२००७ झालेला असून त्यांचे आई वडील अत्यंत गरीब असल्यामुळे व त्यांचा सहारा गेल्यामुळे त्या वयोवृध्द आई वडीलांना रू. १,००,०००/- (एक लाख) ची आर्थिक मदत मिळावी म्हणून मी मागणी केली असता सर्वसाधारण सभेत विषय क्र.२६ या प्रश्नास पुन्हा मंजुरी मिळावी व हा प्रश्न ऐनवेळच्या विषयात घेत असून त्यास मंजुरी द्यावी हिच विनंती.

सुचक : श्री.हिम्मतराव दाभाडे

अनुमोदक :श्री.के.व्ही.मोरे,श्री.कैलास गायकवाड,श्री.दिलीप गायकवाड,सौ.सरिता अशोक ससाणे

श्री.अ.रशिद खान : यापूर्वी रू.२५०००/- देण्यांत आलेले आहे. पंचवीस हजार देण्यांत यावे.

श्री.संतोष जेजुरकर : २५०००/- देण्यांत यावे.

मा.महापौर : रू.२५०००/- ची मदत देण्यास मान्यता देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.९० एकनाथ नगर अंतर्गत चिंतामणी कॉलनी येथील महापालिकेच्या विहीरीत बुडून मरण पावलेला मुलगा गौतम बिऱ्हारे फुलेनगर याच्या आई वडीलास नियमाप्रमाणे रू.२५०००/- आर्थीक मदत देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेतर्फे वार्ड क्र.६४ क्रांतीचौक मधील झांबड इस्टेट येथे बॅडमींटन हॉल बांधण्यात आलेला आहे. यास कै.स्वातंत्र्यसैनिक भाऊराव खैरे बॅडमींटन हॉल असे नांव देण्यात यावे. करीता सदरील हॉलचे कै.स्वातंत्र्यसैनिक भाऊराव खैरे बॅडमींटन हॉल असे नामकरण करण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.रेणुकादास (राजु) वैद्य अनुमोदक :श्री.रविंद्र गांगे,श्री.संतोष खेंडके पाटील

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :प्रस्तावाचे सुचक उपस्थित नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय :नामांतर कमेटी आहे. त्या कमेटी मार्फत असे प्रस्ताव यावे म्हणून निर्णय झाला असे असतांना पुन्हा पुन्हा डायरेक्ट प्रस्ताव सभागृहात येतात कमेटीकडे पाठवावे.

मा.महापौर :स्थगिती देण्यात येते.

श्री.अ.रशिद खान :एका एकाच रस्त्याला दोन तीन नावे देण्यात आलेली आहे राजाबाजार येथील एका रस्त्याला तीन वेळेस नाव दिले गेले. याची प्रशासनाने दखल घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. १७७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-२ सिडको सर्व्हे नं.६८ मध्ये १८ मिटर रोडवर दीशा एकदंत समोरील चौकास केशवानंद चौक नाव देण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील, श्री.रविंद्र गांगे

**संवाद :**

श्री.संजय जोशी : या चौकास या अगोदर नाव दिलेले आहे का खुलासा घेण्यात यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : नाव देण्याच्या संदर्भात सर्व पदाधिकारी यांनी एकत्रित बसून योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री.संतोष जेजुरकर : संत तुकोबा नगरमध्ये वार्ड क्र.७३ मध्ये घ्यावे.

श्री.दामुअण्णा शिंदे : संत तुकोबा नगर मध्ये घ्यावे.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-२ सिडको सर्व्हे नं.६८ संत तुकोबानगर वॉर्ड क्र.७३ मध्ये १८ मिटर रोडवर दीशा एकदंत समोरील चौकास केशवानंद चौक नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.व्दारकाधीश मंदिर ते अप्पा हलवाई, अप्पा हलवाई कॉर्नर ते रमणभाई पारीख यांचे घरा पर्यंत खाराकुंवॉ चौकास "वल्लभ पथ" असे नाव देण्यात यावे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विणा गजेंद्र सिध्द अनुमोदक : श्री.संजय जोशी

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.व्दारकाधीश मंदिर ते अप्पा हलवाई, अप्पा हलवाई कॉर्नर ते रमणभाई पारीख यांचे घरापर्यंत खाराकुंवॉ चौकास "वल्लभ पथ" असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.रंगनाथ रामराव कुबेर, फायर स्टेशन ऑफिसर म्हणून ते महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात कार्यरत असुन ते आज दिनांक ३१.१.२००८ रोजी सेवानिवृत्त होत आहे. त्यांनी सदरील पदावर कार्यरत असतांना विविध उत्कृष्ट अशी अग्निशामक विभागाशी संबंधीत असलेले कामे योग्य रित्या पार पाडलेले असून त्यांना मा.राष्ट्रपती पुरस्कार सुध्दा मिळालेला आहे. त्यांची सेवा लक्षात घेता त्यांना अग्निशामन विभागात अग्निशमन सुरक्षेच्या अंमलबजावणी व आपत्कालीन अंमलबजावणीसाठी स्पेशल फायर ऑफिसर म्हणून रक्कम रू.१०,०००/- (दहा हजार मात्र) प्रतिमहा किंवा योग्य त्या मानधनावर एक वर्षासाठी नियुक्ती देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट, श्री.संतोष जेजुरकर

अनुमोदक : श्री.संतोष खेंडके पाटील,श्री.रविंद्र गांगे,श्री.त्र्यंबक तुपे

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :पोलीस आयुक्तांना शासनाने दिले परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले. अशी नियुक्ती करू शकतो का नियम काय आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:वयोमानाने मनपातून सेवानिवृत्त झाले आहे त्यांचा सत्कार करून १ लाख बक्षीस द्यावे.

श्री.गजानन बारवाल :सेवेत आपण मान सन्मान करू शकतो तज्ञ व्यक्ती आहे ठेवण्याचा अधिकार आहे का पहावे त्यांचे सेवेची गरज आहे मानधनावर घेत आहोत.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एक्सटेन्शन नाही. फीक्स पगारावर ठेवू शकतो. शिक्षकांना दिलेले आहे या अधिकाऱ्यांना घेण्यास हरकत नसावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :मानधनावर यापूर्वी अनेक लोकांना घेतलेले आहे यांना घ्यावे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:पूर्वी पगार ८००० असेल आता १०००० देत असेल ते पहावे.

डॉ.भागवत कराड : कामावर घ्यायचे झाल्यास आपण १०,०००/- देवू शकतो का?

मा.आयुक्त : शेवटचा पगार काय होता सेवानिवृत्तीच्या फरकाची रक्कम देतो.

मा.महापौर :नियमाच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार श्री.रंगनाथ रामराव कुबेर सेवानिवृत्त फायर स्टेशन ऑफिसर महानगरपालिका औरंगाबाद यांना नियमानुसार देय होणाऱ्या रक्कमेवर एक वर्षासाठी देय ठराविक वेतनावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, ब्रिजवाडी येथे महानगरपालिकेतर्फे वाचनालयासाठी इमारत बांधण्यात आलेली आहे. सदरील वाचनालयाच्या इमारतीस दिवंगत हरणाबाई दगडुजी रगडे वाचनालय असे नाव देण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.सुशिलाताई रगडे, श्री.कैलास गायकवाड

अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा, श्री.संतोष जेजुरकर,श्री.महेश माळवतकर,श्री.हिम्मतराव दाभाडे

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ब्रिजवाडी येथे महानगरपालिकेतर्फे वाचनालयासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीस दिवंगत हरणाबाई दगडुजी रगडे वाचनालय असे नाव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ/साँची प्रवेशव्दार उभारणे बाबत प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्रीमती मिराताई रामराव शिंदे

अनुमोदक : सौ.सरिता ससाणे, सौ.अंजली कोंडेकर, श्रीमती जयश्री किवळेकर

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.२३ मसनतपुर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ/साँची प्रवेशव्दार उभारणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग समिती कार्यालय-फ मधिल सर्व स.सदस्य,प्रभाग अधिकारी, प्रभाग अभियंता यांच्या कार्यप्रणालीमध्ये आणखी सुधारीतपणा यावा व विविध विकास कामांसाठी याचा उपयोग व्हावा या दृष्टीकोनातून या सर्वांना नवि दिल्ली महानगरपालिकेतील विविध विकास कामांबाबत माहिती घेण्यासाठी नवि दिल्ली येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात यावे. सदरील अभ्यास दौऱ्यास परवानगी देण्यांत यावी व अभ्यास दौऱ्यास येणाऱ्या संभाव्य खर्चास मंजूरी देण्यांत यावी, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा अनुमोदक : श्री.हिम्मतराव दाभाडे

**संवाद :**

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: किती खर्च देणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :नियमाप्रमाणे जो देता येईल तो द्यावा. कर्मचाऱ्यांना माहिती होईल.

मा.महापौर :मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग समिती कार्यालय-फ मधिल सर्व स.सदस्य,प्रभाग अधिकारी, प्रभाग अभियंता या सर्वांना नवि दिल्ली महानगरपालिकेतील विविध विकास कामांबाबत माहिती घेण्यासाठी नवि दिल्ली येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यास व अभ्यास दौऱ्यास येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १८४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.८२ गुरूदत्त नगर, पुर्व भागास सर्वे नं.४३ मधील ७ एकरचा भुखंड रिकामा असून त्या जमीन मालकास त्या जमिनीचा मोबदला देऊन सदरील जमीन स्मशान भुमीसाठी संपादीत करावी. जेणे करून वार्ड क्र.८२,८३,८४,७०,७१,७२ तसेच जवळील अनेक वसाहतीस त्या स्मशान भूमीचा फायदा होईल. करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक: सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे अनुमोदक: श्री.विजय खुडे, श्री.विनायक पांडे

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :जमिनीच्या संदर्भात आहे योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा. |
| मा.आयुक्त | : आरक्षणाची जागा दिसत नाही १ महिन्यात अभ्यास करून ठेवतो. |
| श्री.गजानन बारवाल | :ठराव मंजूर करावा योग्य असेल ती जागा देण्यात यावी. |
| डॉ.भागवत कराड | :त्या जागेवर स्मशान भुमीची मागणी सदस्यांनी केलेली आहे. ठराव मंजूर करावा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :जागा घ्यावी पण नागरीकांचे सजेशन मागवावे. ज्या भागात ज्याची जागा आहे तो देत नाही टाकून देता अडचणीत येवू नये. |
| श्री.देसरडा प्रशांत | :हा ठराव मंजूर करावा पण रेल्वेस्टेशन राहूलनगरच्या बाजूला स्मशान भुमीसाठी जागा घेतली होती ती सापडत नाही जेकी असे समजते की ती महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेरची होती. |
| डॉ.भागवत कराड | :मंजूरी देण्याच्या आधी यावर प्रशासकीय मत घ्यावे पाहणी करावी त्यानंतर निर्णय घ्यावा. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :जागा कुणाची आहे कुणाच्या ताब्यात आहे घेतांना अडचणी येणार की नाही. |
| श्री.संजय जोशी | : जर स्मशानभुमीसाठी आरक्षीत नसेल तर स्मशानभुमी करू शकत नाही. |
| मा.महापौर | : या प्रस्तावा विषयी प्रशासनाने माहिती घ्यावी त्यावर अभ्यास करून हा प्रस्ताव पुढील बैठकीत आणावा. |

**<u>ठराव :</u>**

या प्रस्तावा विषयी प्रशासनाने माहिती घ्यावी त्यावर अभ्यास करून हा प्रस्ताव पुढील बैठकीत आणावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र. १८५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,वार्ड क्र.८२ अंतर्गत गजानननगर,मातोश्रीनगर,न्यु हनुमान नगर,पारीजातनगर,स्पंदननगर,तापडीया पार्क,दुर्गेश नगर,विश्रांतीनगर,आदी भागामध्ये सुशिक्षित व शालेय विद्यार्थी राहतात. त्या भागासाठी सार्वजनिक वाचनालयाची अत्यंत गरज आहे.

तरी गजानन नगर भागात एक हॉल भाडयाने घेऊन सार्वजनिक वाचनालय उघडण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

सुचक : सौ.पार्वतीबाई विजय वाघमारे अनुमोदक : श्री.सतिष कटकटे, श्री.विनायक पांडे

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.८२ अंतर्गत गजानन नगर भागात एक हॉल भाडयाने घेऊन सार्वजनिक वाचनालय उघडण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु २०२ वर अनुक्रमांक २ वर शाळा दवाखाना इमारती इ.च्या विकासा करीता र.रू.०५ लक्ष आणि पान क्र.डब्ल्यु ३१ वर अनुक्रमांक १५ वर शाळा दवाखाना इमारती इ.च्या विकासा करीता र.रू.०५ लक्ष अशी एकुण १० लक्ष तरतुद उपरोक्त दोन्ही कामे रद्द करून प्रभाग क्र.०१ हर्सुल प्रभागात विविध देखभाल दुरूस्तीचे कामे करण्यास वापरण्यात यावी करीता लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.पुनमचंद बमणे अनुमोदक : श्री.संजय जोशी

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील पान क्र.डब्ल्यु २०२ वर अनुक्रमांक २ वर शाळा दवाखाना इमारती इ.च्या विकासा करीता र.रू.०५ लक्ष आणि पान क्र.डब्ल्यु ३१ वर अनुक्रमांक १५ वर शाळा दवाखाना इमारती इ.च्या विकासा करीता र.रू.०५ लक्ष अशी एकुण १० लक्ष असलेल्या तरतुदी **ऐवजी** प्रभाग क्र.०१ हर्सुल प्रभागात विविध देखभाल दुरूस्तीचे कामे करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील विविध क्रीडा प्रकारातील राष्ट्रीयस्तरावर प्राविण्य/पुरस्कार मिळवलेल्या सर्व खेळाडूंना महानगरपालिकेच्या क्रीडा विभागा अंतर्गत देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात याव्यात. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय रिडलॉन अनुमोदक : श्री.विजय खुडे

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :प्रस्तावाचे सुचक उपस्थित नाही.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :सर्वसामान्य कोणत्या खेळासाठी आहे दिलेले नाही प्रस्ताव अर्धवट आहे.

मा.महापौर :प्रस्ताव स्थगित करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. १८८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,वॉर्डक्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे (वॉर्ड क्र.६६ साठी) लेखाशिर्ष बदलण्यात यावे,करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| दि.२६.१०.०७ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१२४२ नुसार वळती तरतूद. | वॉर्ड क्र.५७ मध्ये खडी रस्ते, मुरूम टाकणे,पेव्हर ब्लॉक दुरूस्ती, जलनिःसारण देखभाल दुरूस्ती, इमारत दुरूस्ती, गटार दुरूस्ती,वॉर्ड कार्यालय इमारतीस रंगकाम करणे, पुल दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे.-५.०० लक्षपैकी शिल्लक **रू.२.५० लक्ष** | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे- **६.०० लक्ष** |
| दि.२६.१०.०७ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१२६४नुसार वळती तरतूद | वॉर्ड क्र.५७ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती करणे, तुटलेले मेनहोल चेंबर्स दुरूस्त करणे, फरशी बसविणे, गटार दुरूस्ती व इतरफुटकळ कामे करणे- **३.५० लक्ष** | |

सुचक : श्री.त्र्यबंक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संजय जोशी

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.५७ मधील कामासाठी अर्थसंकल्पातील तरतूदीत खालील दर्शविल्याप्रमाणे (वॉर्ड क्र.६६ साठी) लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते,

| पान नं. | कामाचे नांव | सुधारीत कामाचे नांव |
|---|---|---|
| दि.२६.१०.०७ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१२४२ नुसार वळती तरतूद. | वॉर्ड क्र.५७ मध्ये खडी रस्ते, मुरूम टाकणे,पेव्हर ब्लॉक दुरूस्ती, जलनिःसारण देखभाल दुरूस्ती, इमारत दुरूस्ती, गटार दुरूस्ती,वॉर्ड कार्यालय इमारतीस रंगकाम करणे, पुल दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे.-५.०० लक्षपैकी शिल्लक **रू.२.५० लक्ष** | वॉर्ड क्र.६६ अंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेज विषयक कामे करणे- **६.०० लक्ष** |
| दि.२६.१०.०७ च्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१२६४नुसार वळती तरतूद | वॉर्ड क्र.५७ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती करणे, तुटलेले मेनहोल चेंबर्स दुरूस्त करणे, फरशी बसविणे, गटार दुरूस्ती व इतरफुटकळ कामे करणे- **३.५० लक्ष** | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्रं.१८९ :**

आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहे की, अग्निशमन विभाग,महानगरपालिका औरंगाबाद येथे औरंगाबाद शहराची वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने काम करण्यासाठी शहरात एकूण ३ फायर स्टेशन कार्यरत आहेत. या ३ अग्निशमन केंद्र चालविण्यासाठी मनपा व एम.आय.डी.सी. चे खालीलप्रमाणे वाहने कार्यरत आहेत. एक अग्निशमन केंद्र कर्मचाऱ्यांअभावी बंद आहे.

| अ.क्र. | वाहन क्र. | मॉडेल | खरेदीचे वर्ष | स्वामीत्व |
|---|---|---|---|---|
| 1. | MCA-2125 | Tata-1210 Fire Tender | 1983 | AMC |
| 2. | MH-20/A-2524 | Tata-1210 Fire Tender | 1990 | AMC |
| 3. | MH-20/A-2052 | Tata-1210 Fire Tender | 1990 | MIDC |
| 4. | MH-20/A-5804 | Tata-1210 Fire Tender | 1993 | AMC |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5. | MH-04/H-8018 | Fire Water Tanker | 1993 | MIDC |
| 6. | MH-04/H-8027 | Foam Tender | 1993 | MIDC |

आपत्कालीन व्यवस्थापन केंद्राअंतर्गत अग्निशमन विभागास औरंगाबाद जिल्ह्यासह जालना व बीड जिल्ह्यासाठीही काम करावयाचे आहे. तथापी मनपा अग्निशमन विभागाकडे अपूरी साधनसामुग्री असल्याने दोन फायर टेंडर खरेदी करणे आवश्यक आहे. १२ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून चार फायर टेंडर वासन ऑटोमेटीव्ह प्रा.लि.वाळुज औरंगाबाद यांच्याकडून Tata Chassis LPT 1613/42 Turbo- प्रत्येकी रू.८,७०,४४३/- प्रमाणे चार चेसीससाठी-Rs.34,82,772/- (अक्षरी रू.चौतीस लाख ब्यांशी हजार सातशे बहात्तर फक्त) खरेदी करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : यासाठी १२ व्या वित्त आयोगाचे पैसे आहे. चार अग्निशमन विभागासाठी वाहने घेण्याचे प्रस्तावित आहे. १२ वित्त आयोगाच्या निधी साठी सर्वसाधारण सभेची मान्यता लागत नाही परंतू चार वाहने घेत आहोत. यासा ५० टक्के पैसे ऑलरेडी उपलब्ध झालेले आहे. पुढील वर्षी जे पैसे येतील ते ५० टक्के खर्च केले जाईल. जर आले नाही तर रेग्युलर मध्ये १ कोटी ठेवून त्यातून खर्च करावे लागेल.

श्री.संजय जोशी :हैद्राबाद महानगरपालिकेकडे एक परदेशी बनावटीची गाडी आहे. २०-२५ मजल्यापर्यत तीचा वापर करता येतो.

मा.आयुक्त :त्या गाडीची किमंत ३-५० कोटी आहे.चार गाडयासाठी लगबग १ कोटी खर्च हा १२ व्या वित्त आयोगाच्या निधीतून खर्च करायचे आहे.

श्री.संजय जोशी : १ कोटीमध्ये चार गाडया घेत आहोत पारंपारिक बनावटीच्या या विभागात गाडया आहे. फायरच्या गाडया आहेत नवीन टेक्नॉलॉजी पध्दतीची एकही गाडी महापालिकेकडे नाही. आता मंजुरी द्यावी चार गाडया घेणे ऐवजी आणखी १० ठिकाणी माहिती घेवून कमी किमतीची अद्यावत प्रकारची गाडी मिळाली तर ती घेण्याची कार्यवाही करावी परंतु चार गाडया घेण्या ऐवजी

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :या विभागास वाहनाची गरज आहे. ३१ मार्च येतो आहे. शासनाकडून जेवढे उपलब्ध होतील तेवढे निधी मिळावावा पुढील वर्षी आणखी लागल्यास निधी उपलब्ध करून देता येईल.

मा.महापौर :प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका अग्निशमन विभागास १२ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून चार फायर टेंडर वासन ऑटोमेटीव्ह प्रा.लि.वाळुज औरंगाबाद यांच्याकडून Tata Chassis LPT 1613/42 Turbo- प्रत्येकी रू.८,७०,४४३/- प्रमाणे चार चेसीससाठी-Rs.34,82,772/- (अक्षरी रू.चौतीस लाख ब्यांशी हजार सातशे बहात्तर फक्त) खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १९० :**

मा.आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना रंगीत गणवेष ०२ जोड व पांढरा गणवेष ०१ जोड देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेष सहाय्य योजनेंतर्गत सन

२००८-०९ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेष उपलब्ध करून द्यावयाचा आहे. महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना शाळा सुरू झाल्यानंतर लगेच गणवेष उपलब्ध करून देण्याच्या मानस आहे. सदर खरेदी ही सन २००८-०९ या वर्षात करावयाची आहे. त्यामूळे जून २००८ मध्ये गणवेष देण्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याची कार्यवाही चालू आर्थिक वर्षातच कार्यवाही सुरू करणे आवश्यक आहे.

तसेच महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना मागील वर्षी एक जोड रेग्जीन शुज,एक जोड कॅनव्हॉस शुज,रंगीत व पांढरे पायमोजे आणि नेक टाय उपलब्ध करून देणे आहे.

सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात शालेय विद्यार्थ्यांची संख्या ही २५,११५ यामध्ये १० % नैसर्गिक वाढ विचारात घेवून साहित्य खरेदी करण्यात आली होती. याच निकषाच्या आधारे चालू शैक्षणिक वर्षात शिक्षण विभागाकडून विद्यार्थी संख्येबाबत लेखी माहिती घेवून त्यानुसार साहित्य खरेदी करण्यात येईल.

सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेष खरेदी करतांना गणवेषाचा दर्जा व गुणवत्ता उच्चतम असावी या हेतूने केवळ उत्पादक कंपन्याकडून निविदा मागवून साहित्य खरेदी करण्यात आले होते. तसेच इतर साहीत्य (शुज,सॉक्स,नेकटाय) हे देखील आयएसओ प्रमाणित कंपनीचे देण्यात आले आहे. सदर गणवेष खरेदी करीता सन २००७-०८ मध्ये १.६४ कोटी व गणवेष साहित्य करिता ४६.५४ लक्ष एवढा खर्च आला होता. सन २००८-०९ या वर्षात सदर खरेदी करिता अंदाजित खर्चात नैसर्गिकरित्या १०% वाढ होत अपेक्षित आहे. पूढील आर्थिक वर्षात याकरीता आवश्यक तरतूद करण्यास्तव तसेच निविदा प्रक्रीया लगेचच सुरू करण्याबाबत मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेष सहाय्य योजनेंतर्गत सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेष (दोन रंगीत व एक पांढरा) व गणवेष साहित्य (एक जोड रेग्जीन शुज,एक जोड कॅनव्हॉस शुज,रंगीत व पांढरे पायमोजे आणि नेक टाय) उपलब्ध करून देणेस व त्या करीता आवश्यक आर्थिक तरतूदीस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं. १९१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अर्थसंकल्प २००७-०८ मध्ये पृष्ठ क्रमांक डब्ल्यू-२६, अ.क्र. २३ वर वार्ड क्र.७५ संजयनगर तान्हाजीनगर येथे रस्त्यावर पथदिवे व्यवस्था करणेसाठी रक्कम रूपये ३.०० लाखाची तरतुद ठेवण्यात आली होती. दिनांक ०२/०८/२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत लेखाशिर्षक बदल अंतर्गत या कामाऐवजी वार्ड क्र.७५, संजयनगर मुकूंदवाडी अंतर्गत तान्हाजीनगर येथे गौतम बुध्दाच्या पुतळयाजवळ हायमास्ट बसविणेसाठी तरतूद वळती करण्यास मान्यता झालेली आहे.

तथापी स.सदस्या सौ.सरिता अशोक ससाणे यांनी दिनांक २२/११/२००७ अन्वये पत्र देऊन वार्ड क्र.७५, संजयनगर मुकूंदवाडी अंतर्गत तान्हाजीनगर येथे गौतम बुध्दाच्या पुतळयाजवळ हायमास्ट बसविणे ऐवजी संजयनगर मुकूंदवाडी मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर हायमास्ट बसविणेची मागणी केलेली आहे.

तरी अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक पृष्ठ क्रमांक २६, अ.क्र.३३, संजयनगर तान्हाजीनगर येथे रस्त्यावर पथदिवे व्यवस्था करणेसाठी ऐवजी संजयनगर मुकूंदवाडी मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर हायमास्ट बसविणेसाठी नवीन लेखाशिर्षक मान्यता व्हावी.

प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : मंजूरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पातील लेखाशिर्षक पृष्ठ क्रमांक २६, अ.क्र.३३, संजयनगर तान्हाजीनगर येथे रस्त्यावर पथदिवे व्यवस्था करणे ऐवजी संजयनगर मुकूंदवाडी मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर हायमास्ट बसविणेसाठी नवीन लेखाशिर्षकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं. १९२ :</u>**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्याची गढूळता काढण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २१,००,०००/- इतकी आहे.

आर्थिक वर्ष २००७-०८ च्या अर्थसंकल्पात रसायन खरेदी अंतर्गत रूपये १०,९९,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. तथापी सन २००६-०७ च्या तुरटी पुरवठयाची मुदत ही १५/०७/२००८ पर्यंत असल्याने या पुरवठयावर २००७-०८ या आर्थिक वर्षात खर्च होणार नाही. यामुळे सन २००८-०९ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये या विभागातर्फे रूपये २१,००,०००/- ची तरतुद करण्यात आलेली आहे.

करीता वार्षीक तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/- मा.सर्वसाधारण सभेसमारे विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेअंतर्गत फारोळा जलशुध्दीकरण केंद्र येथे जलशुध्दीकरण प्रक्रियेत पाण्याची गढूळता काढण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तुरटी ग्रेड-१ चा पुरवठा करण्याचे रक्कम रूपये २१,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं. १९३ :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, बनेवाडी येथे आरक्षण क्र.२ व ३ मध्ये कब्रस्थान व स्मशानभूमी करीता संरक्षित भिंत बांधणे बाबतचा रक्कम रूपये २२,५६,९९८/- एवढया अंदाजपत्रकाचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. सदरील कामाचे खर्च प्रस्तावाला सन २००६-२००७ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

निविदा काढल्यानंतर जाय मोक्यावर जागेचा ताबा मिळणेसाठी दिरंगाई होत असल्याने आजपर्यंत सदरील संरक्षित भिंतीचे काम प्रलंबित आहे. अशा परिस्थितीमध्ये जागा बदलून तेच काम नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड/नारेगांव कब्रस्थान व स्मशानभूमी येथे केल्यास महानगरपालिकेच्या जागेचे संरक्षण करता येईल. आणि पुन्हा-पुन्हा संरक्षित भिंत बांधणेच्या कामाचे प्रस्ताव तयार`रण्याची आवश्यकता भासणार नाही.

करीता बनेवाडी येथे आरक्षण क्र.२ व ३ मध्ये कब्रस्थान व स्मशानभूमी करीता संरक्षित भिंत बांधणे ऐवजी जागा बदलून नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड/नारेगांव कब्रस्थान व स्मशानभूमी येथे रक्कम रूपये २२,५६,९९८/- एवढया अंदाजपत्रकीय रकमेचे संरक्षित भिंत बांधणेच्या जागा बदलणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बनेवाडी येथे आरक्षण क्र.२ व ३ मध्ये कब्रस्थान व स्मशानभूमी करीता संरक्षित भिंत बांधणे ऐवजी जागा बदलून नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड/नारेगांव कब्रस्थान व स्मशानभूमी येथे रक्कम रूपये २२,५६,९९८/- संरक्षित भिंत बांधणेच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं. १९४ :</u>**

मा.आयुक्त,महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाधववाडी येथे वाहतुक नगर तयार करणेसाठी मनपाच्या ताब्यात १० एकर जमीन उपलब्ध असून सदर प्रकल्प विकास करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या दि.१९.६.२००६ रोजीच्या विषय क्र.२७४/२ नुसार रूपये २०० लक्षची मंजूरी प्राप्त आहे. तसेच सन २००७-०८ च्या अर्थसंकल्पात रूपये ३०० लक्षची तरतुद करण्यात आली आहे.

विकास कामाचे अंदाजपत्रके तयार करण्यात आले असून उपलब्ध १० एकरपैकी ६ एकर मध्ये महानगरपालिकेचे वाहतुक नगर, मध्यवर्ती जकात नाका,गोडाऊन,यांत्रीकी प्रयोगशाळा,वेब्रीज इत्यादी विकास कामांसाठी अंदाजपत्रके तयार करून निविदा काढण्यांत येऊन मा.स्थायी समितीची मंजूरी प्राप्त आहे.

उर्वरीत ४ एकर वाहतुक नगरशी संबंधीत कार्यासाठी जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी वाहतुकदारांना राहणेसाठी सोय उपलब्ध करून देणे (लॉजींग) रेस्टॉरंट,बँक,ट्रान्सपोर्ट प्लाझा,वाहनदुरूस्ती,ॲटोपार्टस,गॅरेज,पेट्रोलपंप व वाहने उभी करण्यासाठी सोय उपलब्ध करणे, इ.साठी जागेचा विकास करणेचा मनपाचा मानस आहे. यासाठी सदर ४ एकर जागा ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर खाजगी वाहतुक नगर विकसीत करणेसाठी कमीतकमी पाच हजार ते दहा हजार चौरस फुटाचे भूखंड पाडून देणेसाठीचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : मंजूरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जाधववाडी येथे वाहतुक नगर तयार करणेसाठी महानगरपालिकेच्या ताब्यात उपलब्ध असलेल्या १० एकर जमीन पैकी उर्वरीत ४ एकर जागा ९९ वर्षाच्या भाडे तत्वावर खाजगी वाहतुक नगर विकसीत करणेसाठी कमीतकमी पाच हजार ते दहा हजार चौरस फुटाचे भूखंड पाडून देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रं. १९५ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.सर्वसाधारण सभेत ठराव क्र.११४९ दि.२९.०९.२००७ अनुसार नंदनवन कॉलनी, येथील मंजूर रेखांकन यांचे क्लबसाठी आरक्षित जागेवर अतिरिक्त सुविधानुसार भूखंडावर जिम्नेशियम हॉल व सांस्कृतिक सभागृह यांच्या बांधकामास मंजूरी दिली आहे. यामध्ये बॅडमिंटन हॉलचा समावेश करून या ठिकाणी मनपातर्फे सांस्कृतिक सभागृह,बॅडमिंटन हॉल साठी मंजूरी देण्यात यावी. तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह व बॅडमिंटन हॉल हे नांव देण्यांत यावे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.पुरूषोत्तम रघुविरसिंग ठाकुर,श्री.संतोष जेजुरकर

अनुमोदक : श्री.रविकांत गवळी, श्री.विनायक पांडे

मा.महापौर : मंजूरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नंदनवन कॉलनी, येथील मंजूर रेखांकनातील आरक्षित जागेवर जिम्नेशियम हॉल व सांस्कृतिक सभागृह,यामध्ये बॅडमिंटन हॉल बांधणेचा समावेश करणेस तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह व बॅडमिंटन हॉल असे नांव देणेसही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं.१९६ :**

दिनांक १६.०२.०८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.१३० अन्वये स्थायी समितीने मंजूर केलेल्या दुरूस्तीसह मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत आली आहे.

सन २००६-०७ साठी मा.सर्वसाधारण सभा दि.१८.०२.०६ ठराव क्र.१९६/१ अन्वये सर्वसाधारण सभेने पूढील चार वर्षाकरीता कर योग्य मुल्य दर निश्चिती केली आहे. त्यानुसार दि.१ एप्रिल २००६ पासून सिडको भागातील मिळकतींना **Rateable Value** ठरविण्यात आले आहे. त्यानुसार कर योग्य मुल्य दर ठरविण्यात आले आहे. **सर्वसाधारण सभा कर वसुलीची टक्केवारी निश्चित करते** व त्या प्रमाणे Rateable Value वर टक्केवारी लावून कर लावण्यात येतो. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची -ड मधिल प्रकरण ८ मध्ये नियम २० अन्वये पुर्वलक्षी प्रभावाने कर आकारता येणे शक्य नाही. तसेच पुर्ण शहरासाठी एकाच धोरणानुसार Rateable Value लावणे व त्यावर एकाच धोरणाप्रमाणे **Taxation Rate** (Percentage) लावून कर लावणे अभिप्रेत आहे.

करिता सिडको भागातील मिळकतींना रू.५/- प्रती चौ.मी.प्रमाणे कर आकारणी करणेचा ठराव प्रशासन अंमलबजावणी करू शकणार नाही.

करिता वरिल प्रमाणे प्रस्ताव दुरूस्तीस्तव सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : फेब्रुवारी मध्ये टॅक्स लावण्याचा विषय मंजूर केला त्यात मा.महापौर यांनी अशी रूलींग दिली की सिडकोसाठी ५ रू चौ.मी. प्रमाणे आकारणी करण्यात येईल. त्याचे लिगली प्रशासन इम्लीमेंन्ट करू शकत नाही. जे ५ रू प्रमाणे टॅक्स लागू करण्यात येईल ते ५ रू दराने कधी टॅक्स लागू होतच नाही. आपल्याला रिटेबल व्हॅल्यू डिसाईड करावी लागते त्यावर टक्केवारी आपण ठरवितो. सरसकट ५ रूपये केले तर ऍक्च्यूली सिडकोला महाग पडेल ५ रू चा आपणने रिटेबल व्हॅल्यू करायला पाहिजे होता पण जो ठराव सभागृहाने केलेला आहे तो आता समोर ठेवलेला आहे.

श्री.देसरडा प्रशांत :काय पाहिजे हे प्रशासनाला माहित आहे. नियमाने जे काही असेल त्याप्रमाणे अमलबजावणी करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : सिडकोच्या मालमत्ता संदर्भात ५ रू प्रमाणे कर आकारणीचा ठराव मंजूर केलेला आहे. प्रशासनाने त्याला नियमात बसवावे काय करायचे त्या दिवशीही बोललो. त्यापेक्षा जास्त टॅक्स दयायला परवडत नाही. प्रशासनाने कायदेशीर कार्यवाही करावी ज्याची कुणाची मंजूरी पाहिजे ती सर्वाची घ्यावी.

मा.आयुक्त :दोन लिगल ऑब्जेक्शन आहे. एक असे की ५ रू प्रमाणे दर नसतातच.

श्री.अ.रशिद खान :लिगल मध्ये बसत असेल तर त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :३१ मार्चला डिक्लेर करावे लागते की पुढील वर्षाचे टॅक्स काय राहिल. प्रशासन ५ रू प्रमाणे प्रॉपर्टी टॅक्स लावण्यात यावा असे लिगली आदेश म्हणून काढता येणार नाही. इनलिगल ठराव होईल.

श्री.प्रशांत देसरडा :सदर प्रस्ताव दुरूस्तीसहीत मंजूर केलेला आहे. आमचे म्हणणे काय आहे हे सर्व प्रशासनाला माहित आहे.

मा.आयुक्त :हे होवू शकत नाही ३१ तारखेला डिक्लेर करण्यासाठी लिगल अडचण येईल. डिक्लेर काय करणार ?

डॉ.भागवत कराड :लिगल अडचण काहीही नाही ९-५० प्रमाणे आहे ५ रू प्रमाणे करावे.

मा.आयुक्त : ९-५० रिटेंबल व्हॅल्यू आहे त्याचे ४० टक्के कमीत कमी लागते. ५ रू दर केलेला आहे ९-५० प्रमाणे ४० टक्के ४ रू होतात असे असतांना ५ रू प्रमाणे दर आकारणी करणार का? ॲक्टमध्ये क्लिअेरकट आहे की रिटेंबल व्हॅल्यूच्या टक्केवारीनुसार घेण्यात यावे. सरसकट ५ रू प्रमाणे करणे योग्य नाही.

डॉ. भागवत कराड : ठिक आहे ३५ टक्के प्रमाणे ४-५० रू. होतात त्याप्रमाणे घ्यावे.

मा.आयुक्त :पुर्ण शहरासाठी एक रेटने टॅक्स असणार ?

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :हा विषय जो काढला पाणी पुरवठा करण्यासाठी का सारखेपणा ठेवला नाही. पहिल्यांदा सिडको भाग महापालिकेत येत आहे सिडकोला एवढा टॅक्स भरण्याची सवय नव्हती. ५ रू फक्त सिडकोसाठीच केलेले आहे ते त्यात बसवावे.

मा.आयुक्त : ५ रू प्रमाणे रेट लावावे दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर केला त्यामूळे इम्प्लीमेंन्ट करू शकत नाही. ३१ तारखेला डिक्ले्र करायचे आहे.

डॉ.भागवत कराड : नेमकी दुरूस्ती काय पाहिजे. कारण रिटेबल व्हॅल्यू ९-५० ऐवजी ५ रू फक्त सिडकोसाठी केलेला आहे.

मा.आयुक्त :फक्त सिडकोसाठी करता येणार नाही. पुर्ण शहरासाठी एकच दर ठेवावे लागेल. रेट ऑफ टॅक्सेसन करण्याचे अधिकार सभागृहाचे आहे आपण विचारविनिमय करून किती टक्के करायचे निर्णय घ्यावा.

श्री. दत्ताभाउ पाथ्रीकर :सिडकोची घरे पुर्ण लिजची आहे.

मा.आयुक्त :या संबधी आजच्या बैठकीत निर्णय घ्यावा जेणे करून ३१ मार्चला डिक्लेर करता येईल.

श्री.काशिनाथ कोकाटे : या प्रस्तावास दुरूस्ती सह मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौर : या संबधी मा.आयुक्तांना अधिकार देण्यात येतात दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तुत प्रस्तावासंबंधी मा.आयुक्त यांना अधिकार देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रं.१९६-अ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२६ गणेशनगर येथे जिम्नॅशियम हॉल बांधणेकरीता सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली होती तथापी सदर कामाऐवजी प्रतापगडनगर येथे संरक्षित भिंत बांधण्यात यावी व यासाठी सदरील

उर्वरीत आर्थिक तरतूद खर्च करण्यात यावी करिता लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ हरिभाऊ कोकाटे

अनुमोदक : श्री.कैलास गायकवाड,श्री.मिलींद दाभाडे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२६ गणेशनगर येथे जिम्नॅशियम हॉल बांधणेकरीता सन २००७-२००८ च्या अर्थसंकल्पात असलेली तरतूद प्रतापगडनगर येथे संरक्षित भिंत बांधण्याकरीता सदरील उर्वरीत आर्थिक तरतूद खर्च करण्यास लेखाशिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.गजानन बारवाल : जकात खाजगीकरण रद्द झाल्याची माहिती मिळालेली आहे हे सत्य आहे का?

मा.आयुक्त : अधिकृत माहिती आलेली नाही.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद.